
वर्ष १ले अंक १ला एप्रिल २०२१

डिजीटल ई-मासिक

# प्रेरणा

आंतरिक हाकेला साद... यश निर्विवाद







❖ मुख्यसंपादक ❖

नासा येवतीकर, धर्माबाद

मो.नं. 9423625769

eprerna2021@gmail.com

❖ मुख्यसंपादक ❖

नासा येवतीकर, धर्माबाद

मो.नं. 9423625769

❖ प्रमुख मार्गदर्शक ❖

नागेश सू. शेवाळकर, पुणे

मो.नं. 9423139071

❖ संपादकीय टीम ❖

सौ. रुपाली गोजवडकर, नांदेड

मो.नं.8007874965

श्रीमती मीना खोंड, हैद्राबाद

मो.नं.7799564212

श्रीमती स्नेहलता कुलथे, बीड

मो.नं.7588055882

श्री सुंदरसिंग साबळे, गोंदिया

मो.नं.9370988178

श्रीमती सुनीता आवंडकर, धुळे

मो.नं.9850328663

सौ.प्रिती दबडे, पुणे

मो.नं.9326822998

❖ मुखपृष्ठ व अंक सजावट ❖

श्री गणेश साळुंके, जालना

मो.नं.8390132085

❖ प्रकाशन ❖

श्री सुनील सामंत,

ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे

मो.नं.9869674820

साहित्य सेवक whatsapp समूहाचे

# डिजीटल ई-मासिक प्रेरणा

"प्रेरणा या ई-मासिकात प्रकाशित केलेले लेख, कविता व इतर माहितीशी मुख्यसंपादक, संपादक व इतर सहकारी प्रतिनीधी सहमत असतीलच असे नाही. सदरील मासिकातील माहीती वेगवेगळ्या माध्यमातून संकलित केलेली असून त्यांना एकत्रीत आणून सदरील मासिक डिजीटल स्वरुपात प्रसिध्द केलेले आहे."

या अंकातील काही छायाचित्रे इंटरनेटवरुन साभार घेतलेली आहेत.



# संपादकीय...

आयुष्यातील सर्वात मोठा आनंद म्हणजे, जे तुम्हाला जमणार नाही, असं लोकांना वाटतं, ते साध्य करून दाखवणं होय. असे विचार माणसाला प्रेरणा देऊन जातात. त्या प्रेरणेतून व्यक्ती घडत असतो. म्हणून कोणी तरी प्रेरणा देणारा देखील मिळायला हवे. याचसाठी मागील वर्षी साहित्य सेवक नावाचा **whatsapp** समूह निर्माण करण्यात आला. ज्यात महाराष्ट्रातील अनेक लेखक, लेखिका, कवी, कवयित्री, कथाकार, गझलकार, आणि निवेदक यांनी सहभाग घेतला. एकामेकांना प्रेरणा देत आणि घेत ही वाटचाल सुरू झाली. लॉकडाऊनच्या काळात घरात बसून काय करावे म्हणून रो एक लेख हा उपक्रम पन्नास दिवस चालविण्यात आला आणि त्यात समूहातील 30-35 मंडळींनी सहभाग नोंदविला. त्याचा एक सुंदर ई बुक देखील प्रकाशित करण्यात आले. समूहातील साहित्यिक मंडळींना प्रेरणा देण्याच्या उद्देशाने प्रेरणा नावाचे ई मासिक काढण्याचे ठरविण्यात आले.

पुण्यातील जेष्ठ साहित्यिक नागेश सू. शेवाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील अंक निर्मिती करण्याचे काम हाती घेण्यात आले. शेवाळकर सरांची आम्हा सर्वांना नेहमी प्रेरणा असते म्हणून आम्ही काही तरी नवीन करण्यासाठी धडपड करत असतो. या अंकाची संपादन करण्यासाठी नांदेडच्या उपक्रमशील शिक्षिका सौ. रुपाली गोजवडकर, हैद्राबाद येथील बालसाहित्यिक श्रीमती मीना खोंड, बीडच्या कवयित्री श्रीमती स्नेहलता कुलथे, गोंदियाचे पक्षिमित्र तथा उपक्रमशील शिक्षक श्री सुंदरसिंग साबळे, धुळे येथील स्तंभलेखिका श्रीमती सुनीता आवंडकर, पुण्यातील कवयित्री सौ.प्रिती दबडे यांचे मोलाचे असे सहकार्य लाभले. या अंकाचे मुखपृष्ठ व अंक सजावटीचे काम जालना येथील क्रियाशील शिक्षक श्री.गणेश साळुंके यांनी खूप सुंदर केले. ठाणे येथील ई साहित्य प्रतिष्ठानचे श्री.सुनील सामंत यांनी आपल्या वेबसाईटवर हा अंक प्रकाशन केले आहे. त्याबद्दल त्यांचे ही मनस्वी आभार. अरविंद काका कुलकर्णी, डॉ.हनुमंत भोपाळे, धनंजय गुडसुरकर अश्या अनेक जेष्ठ साहित्यिक मित्रांचे आशीर्वाद आणि शुभेच्छा पाठीशी आहेत म्हणून हा अंक यशस्वीपणे साकार झाला आहे.

पहिला अंक गुढीपाडवाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आला असून यात गुढीपाडवासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतिबा फुले जयंती, वसंत ऋतू, उन्हाळा, पळस या विषयासंबंधी लेख आणि कविता वाचण्यास मिळतील. त्याचसोबत काही लघुकथा, पुस्तक परिचय, पुस्तक समीक्षा, रेसिपी आणि काही चित्रांचा देखील यात समावेश केला आहे. वाचकांना हा अंक मनोमन आवडेल याची मला खात्री आहे. आपल्या सूचना किंवा सुधारणा व प्रतिक्रिया आम्हाला **email** वर जरूर कळवा. म्हणजे पुढील अंकात विचार करण्यात येईल. तेव्हा पुन्हा भेटू पुढील अंकात तोपर्यंत काळजी घ्या स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची. बाहेर जातांना तोंडावर मास्क लावा, सुरक्षित अंतर ठेवून बोला, आपले हात स्वच्छ धुवा या त्रिसूत्रीचा वापर नेहमी करून कोरोनापासून दूर राहू या.

नासा येवतीकर, धर्माबाद जि. नांदेड
9423625769
**मुख्यसंपादक**

डिजीटल ई-मासिक प्रेरणा



# ❀ शुभेच्छा ❀



आंतरिक हाकेला साद,
यश निर्विवाद !

हे या लेखाचे शीर्षक असले तरीही ते 'ई प्रेरणा' या मासिकाचे ब्रीद वाक्य आहे. हे ब्रीद समोर ठेवून ई प्रेरणा मासिकाची साहित्य क्षेत्रात यशस्वी वाटचाल होणार आहे हे नक्की.

'सत्यमेव जयते' हे आपल्या देशाचे ब्रीद आहे. 'सत्याचा नेहमी विजय होतो' असा याचा अर्थ आहे. सत्य समोर ठेवून आम्ही वाटचाल करणार, असत्याला आम्ही थारा देणार नाही असाही अर्थ कदाचित हे ब्रीद ठरवताना आपल्या राष्ट्रप्रमुखांचा हेतू असणार.

'साहित्य सेवक' हा आता केवळ व्हाट्सअप् समूह राहिलेला नसून ती एक चळवळ होते आहे. लिहित्या हाताला बळ देताना विविध साहित्य उपक्रमात सहभागी होण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. साहित्य विषयक चर्चा असतील, कथा- कवितांचे लेखन आणि सादरीकरण असेल, पुस्तकांचे प्रकाशन असेल इत्यादी अनेक उपक्रम राबविणाऱ्या साहित्य सेवक या संमूहाने आता एक पाऊल पुढे टाकले आहे. गुढीपाडवा हा मराठी वर्षातील पहिला सण! नवे संवत्सर!! नवीन काहीतरी करण्याची ऊर्मी यावी, संकल्प करून तो सिद्धीला नेण्याची प्रेरणा मिळावी असा हा सण!

साहित्य सेवक या समूहाचे प्रमुख श्री ना. सा. येवतीकर हे उपक्रमशील शिक्षक म्हणून जसे प्रख्यात आहेत तसेच ते प्रयोगशील आणि प्रयत्नशील लेखक म्हणून विख्यात आहेत. त्यांच्या सुनियोजिनातून अनेक साहित्य विषयक कार्यक्रम या समूहात सुरू असतात. 'प्रेरणा' हे या मासिकाचे शीर्षकही त्यांच्या उपक्रमशील व्यक्तिमत्त्वाला साजेसे असेच आहे. समूहातील सदस्यांना प्रेरणा देऊन त्यांना लिहिते करण्याचे काम नासा मोठ्या उत्साहाने करतात. नासा म्हणजे साहित्य क्षेत्रातील एक चालतेबोलते व्यासपीठ आहे असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे ठरु नये.

प्रेरणा हे शीर्षक ठरवताना नासांनी जी कल्पकता दाखवली तीच कल्पना त्यांनी मासिकाचे ब्रीद निश्चित करताना दाखवली आहे...

'अंतरी हाकेला साद,
यश निर्विवाद!'

प्रत्येकाच्या मनात काही ना काही विचार, चिंतन-मनन चालू असतात. हे विचार म्हणजे त्या त्या व्यक्तीच्या हृदयाने, मनाने घातलेली साद असते. या अंतरीच्या सादेला ती व्यक्ती ज्या क्षेत्रात असते तद्नुरुप ओ देत असते. कधीकधी दोन मनाचे द्वंद्वही माजते. यामुळे हृदयात प्रचंड खळबळ माजते परंतु जी व्यक्ती आपल्या मनाने दिलेल्या हाकेला सकारात्मक प्रतिसाद देते, मनाच्या द्वंद्वातील चांगले ते घेऊन कार्य करते त्याच्या पाठी यश हमखास धावत येते.

लेखकाच्या मनातही असे असंख्य विचार घोळत असतात. साहित्य विषयांची रेलचेल असते. अंतर्मनाने घातलेल्या या सादेला अक्षरांनी सजवले की, उत्कृष्ट साहित्य निर्माण होते. संपादक मंडळाने निवडलेल्या या ब्रीद वाक्याचा एक अर्थ मला असा जाणवतो की, प्रेरणा या ई मासिकाचे संपादक नासा आणि त्यांचे संपादकीय मंडळ यांनी साहित्य सेवक या समूहातील लेखकांना एक मनापासून साद घातली आहे की, 'या लेखकांनो, या. प्रेरणा मासिकासाठी लिहा. तुमच्या लेखणीपासून प्रेरणा घेऊन अनेक लेखक लिहिते होतील. सोबत तुमच्या विचारातील अमृतकणांमुळे समाजाला एक दिशा मिळेल. तुमच्या विचारांनी झालेले समाज प्रबोधन हे फार मोठे यश असेल.'

'यश निर्विवाद' याचा अर्थ फार मोठा आहे. यश हे केवळ स्वतःपुरते किंवा एखाद्या लहान मोठ्या पुरस्कारात सामावले जाऊ शकत नाही. पुरस्कार हा वैयक्तिक असतो परंतु समाज कल्याणासाठी केलेले कार्य कुणाच्या तरी जीवनात चैतन्य, आनंद, स्फूर्ती निर्माण करते ते यश फार मोठे असते.

या ब्रीदाला असाही एक पदर आहे तो म्हणजे साहित्य सेवक हा समूह संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचला आहे. दूरवर असणाऱ्या साहित्यिकांना जवळ, एकत्र आणण्याचे साधन म्हणजे लेखणी आणि साहित्य! या सर्व लेखकांना नासा आणि संपादकीय मंडळाने मनापासून साद घातली आहे... ही त्यांच्या अंतरीची हाक आहे की, लेखकांनो लिहिते व्हा, प्रकट व्हा. एकमेकांना प्रेरणा द्या. यश तुम्हाला शोधत निश्चितच तुमच्या दारी येईल.

प्रेरणा मासिकाचा पहिला अंक गुढीपाडवा या शुभदिनी, शुभमुहूर्तावर प्रकाशित होतो आहे. प्रमुख संपादक नासा, संपादकीय मंडळ, सर्व लेखक आणि वाचक यांना भरभरून शुभेच्छा!

नागेश सू. शेवाळकर, पुणे
(९४२३१३९०७१)

## ❁ शुभेच्छा ❁



साहित्य क्षेत्रात नेहमीच नवनविन उपक्रम यशस्वीपणे राबविणारे शिक्षक श्री . ना . सा . येवतीकर सरांनी ई प्रेरणा या साहित्य पत्रिकेत मधे ही विविध मान्यवर साहित्यिकांचे दर्जेदार साहित्य आपल्याला वाचायला मिळणार आहे . तसेच नवोदित लेखकांना ही हे ई प्रेरणाचे व्यासपीठ नक्कीच प्रेरणादायी ठरेल !

साहित्य क्षेत्रातील लिखाणात सातत्याने भरीव कामगिरी करणारे श्री . ना . सा . येवतीकर सरांना व ई प्रेरणा या साहित्य पत्रिकेला खूप खूप शुभेच्छा !

अरविंद कुलकर्णी पुणे
9834114379

## ❁ शुभेच्छा ❁



गुढीपाडव्याच्या सुमुहुर्तावर ई साहित्य प्रकाशित आणि ना. सा. येवतीकर संपादित ' प्रेरणा 'मासिक प्रकाशित होत असून शब्दफुलांनी ,शब्दगंधाने नटलेला प्रथम अंक दिमाखात येतोय. सृजन प्रक्रियेत प्रथम निर्मिती अतिशय आनंददायी कौतुकाची असते. प्रेरणा मासिकाचा प्रथम अंक वैविध्यपूर्ण आगळा वेगळा संपन्न असणार आहे. ना. सा.येवतीकर सरांचा साहित्यविषयक दृष्टीकोन मूल्याधारित असून त्यांना संस्कार मूल्यांची जाण आणि सामाजिक बांधिलकीचे भान आहे.त्यामुळे हा अंक समाजातील लहान थोर सर्व व्यक्तींकरिता मनोरंक माहितीपूर्ण साहित्य लालित्य समाविष्ट असणारा सर्वंकश आहे.

संपादकांना हार्दिक शुभेच्छा आणि अभिनंदन!

ई साहित्य प्रकाशनाला अनंत शुभेच्छा आणि अभिनंदन! प्रेरणाच्या सर्व टीमचे अभिनंदन!

मीना खोंड, हैद्राबाद
7799564212

डिजीटल ई-मासिक

# प्रेरणा

## ❖ अंतरंग ❖


| अ.क्र. | घटक | लेखक / कवि / संकलन | पान नं. |
|---|---|---|---|
| 01 | गुढीपाडवा | सौ. आरती डिंगोरे | 07 |
| 02 | उन्हाळ्यातला पळस वृक्ष | सौ. भारती सावंत | 09 |
| 03 | अलक कथा | मीना खोंड | 11 |
| 04 | कोरोना संपणार | अंकुश शिंगाडे | 12 |
| 05 | वेळ | अरविंद कुलकर्णी | 15 |
| 06 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर | श्रीमती मेघा पाटील | 17 |
| 07 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समाज परिवर्तन | सौ. भारती तिडके | 20 |
| 08 | ज्योतिबा फुले जयंती | सौ. किरण कावळे | 22 |
| 09 | पुस्तक परिचय | शिरीष देशमुख | 24 |
| 10 | राजा दाहीर सिंग | सुनील वाडे | 27 |
| 11 | त्रिकोण | सौ. गौरी शिरसाट | 29 |
| 12 | न फिटणारे ऋण | महेन्द्र सोनेवाने | 31 |
| 13 | हट्टी आजोबा | सविता साळुंके | 33 |
| 14 | रेसिपी (पौष्टीक लाडू) | प्रीती दबडे | 35 |
| | कविता विभाग | | |
| 15 | गुढीपाडवा | पांडुरंग अडबलवाड | 36 |
| 16 | एकांत आणि आठवणी | सौ. सुभद्रा खेडकर | 36 |
| 17 | वसंत फुलला मनोमनी | सौ. भारती सावंत | 37 |
| 18 | काळोख | कविता नरवडे | 38 |
| 19 | सुखाचे सोबती | आनंद यडपलवार | 38 |
| 20 | नको जाऊ दूर | सौ. सरोज गाजरे | 39 |
| 21 | आठवण शाळेची | यशोधरा सोनवणे | 39 |
| 22 | पालापाचोळा | शुभदा दीक्षित | 40 |
| 23 | कोरोना | मीना खोंड | 40 |
| 24 | कोरोना राक्षस | सौ. प्रिती दबडे | 41 |
| 25 | चांदणरात | सौ. गौरी शिरसाट | 41 |
| 26 | एका दिलाने राहू या | जी. एस. कुचेकर | 42 |
| 27 | ज्योतीचा बा | आरती डिंगोरे | 43 |
| 28 | चित्र, रांगोळी, वाढदिवसाच्या शुभेच्छा | | 44 |

# गुढीपाडवा



भारतीय सौर राष्ट्रीय पंचांगानुसार वर्षाचा पहिला महिना चैत्र असतो.सूर्य जेव्हा मेष राशीत प्रवेश करतो त्यावेळी भारतीय सौर पंचांग सुरू होते. चैत्र शुद्ध प्रतिपदा हा दिवस भारतीय संस्कृतीत' महापर्व 'म्हणून साजरा केला जातो. या दिवशी गुढी उभारून नवं वर्षाचे स्वागत केले जाते.नववर्षाच्या पहिल्या दिवशी नवे संकल्प करून प्रगतीकडे वाटचाल सुरू करण्याचा हा दिवस गुढीपाडवा म्हणून साजरा केला जातो. साडेतीन मुहूर्तांपैकी तो एक मुहूर्त मानला जातो. या दिवशी नवीन वस्तूंची खरेदी, व्यवसायाची सुरुवात व नव्या उपक्रमांचा प्रारंभ केला जातो. या दिवसापासून चैत्र नवरात्रीस सुरुवात होते.वर्षातील चार नवरात्रांपैकी हे पहिले नवरात्र.

तसेच या दिवसापासून राम जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचा सुद्धा प्रारंभ होतो. कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यात स्वातंत्र्य प्राप्तीच्या आनंदामुळे विजयदिन म्हणून संवत्सर पाडवो वा उगादी अशा वेगवेगळ्या नावांनी व पद्धतीने हा सण साजरा करण्यात येतो. सिंधी लोक चेटीचंड नावाने या उत्सवाला संबोधतात. प्रभू रामचंद्रांनी 14 वर्ष वनवास संपवून लंकापती रावणाचा पराभव करून याच दिवशी अयोध्येत प्रवेश केला. दैवी विचारांनी आसुरी वृत्तीवर, योगाने भोगावर, विभूतीने वैभवावर आणि विचारांनी विकारांवर मिळवलेल्या विजयाचे प्रतिक म्हणजे गुढी होय. गुढी विजय व समृद्धीचे प्रतीक आहे.

शालिवाहन नावाच्या कुंभाराच्या मुलाने शकांचा पराभव करण्यासाठी मातीच्या सैनिकांचे पुतळे तयार केले व त्यात प्राण घालून त्यांच्या साह्याने शकांचा पराभव केला अशी आख्यायिका प्रचलित आहे. शालिवाहनाने मातीच्या सैन्यात प्राण भरला हे एक लाक्षणिक कथन आहे. त्याकाळात चेतनाहीन,पौरूषहीन व पराक्रमहीन बनलेल्या लोकांमध्ये त्याने चैतन्य भरले त्यांच्यामधील पराक्रम जागृत केला आणि शत्रूचा पराजय झाला. शालिवाहन राजाच्या ह्या विजयाप्रीत्यर्थ त्याच्या नावाने नवीन कालगणना शालिवाहन शक सुरु झाला.

या महिन्यापासून वसंत ऋतूची सुरुवात होते. सर्व ऋतूंमध्ये वसंतऋतु मीच असे गीतेच्या दहाव्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात. वसंत निसर्गाला नवा बहर देतो आरोग्यदायी वातावरण ठेवतो. प्रातःकाली हिंग, ओवा, मीठ, मिरी आणि साखर कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात. त्यामुळे पचनक्रिया सुधारते. पित्ताचा नाश होतो. त्वचारोग बरे होतात. कडुनिंबाची पाने धान्यातील कीड संपवतात. कडूनिंब जंतुनाशक असल्याने घरात येणाऱ्या रोगजंतूना अटकाव होतो.शरीराला थंडावा देणाऱ्या कडुनिंबाचे पाणी आंघोळीच्या पाण्यात घालतात. ती पाने वाटून खाणे आरोग्याच्या दृष्टीने हितकारक समजले जाते. कडुलिंबाचे सेवन करणारा सदा निरोगी राहतो. चांगले विचार

आचरणात आणताना कष्ट पडतात एवढेच नाही तर ते कटू वाटतात पण तेच विचार जीवन उदात्त बनवतात. अशा सुंदर सात्विक विचारानेच मानसिक आणि बौद्धिक आरोग्य चांगले राहते. शिवाय प्रगतीपथावर जाणा-याला जीवनामध्ये कित्येक वेळा कटू घोटही द्यावे लागतात याचीच सूचना जणू यातून मिळते.

या दिवशी अभ्यंगस्नान केल्याने रज, तम गुण एक लक्षांश एवढे कमी होतात व तेवढ्याच प्रमाणात सत्वगुण वाढतात. गुढीपाडव्याला ब्रम्हांडातील प्रजापति लहरी जास्तीत जास्त पृथ्वी वर पाठवल्या जातात. या लहरी खेचून घेण्याचे काम गुढी करते. तांबे धातू या लहरींना आकर्षित करतो तांब्याचे मुख खाली असल्याने त्या लहरी घरात प्रवेश करतात या लहरींनी संस्कारित तांब्यातून वर्षभर पाणी पिल्याने आरोग्य लाभते.

गुढीचे महात्म्य सांगताना ज्ञानेश्वर माऊली म्हणतात की, 'अधर्माची अवघी तोडी| दोषांची लिहीली फाडी| सज्जनांकरवी गुढी| सुखाची उभवी||'

आज संपूर्ण जग कोरोना या महामारीच्या विळख्यात अडकले आहे. सर्वत्र असुरक्षितता, भीती, शंका, नैराश्याचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत स्वतःची व कुटुंबाची काळजी घेत 'ये भी दिन जायेंगे' असे म्हणत धैर्याने, संयमाने आलेल्या परिस्थितीला सामोरे जाणे हेच आपल्या हातात आहे. आणि म्हणूनच आज आशेची, सकारात्मकतेची, धैर्याची, संयमाची, आरोग्याची गुढी उभारण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे.

संत एकनाथ हेच तर सांगून गेले, गुढी उभारावी हर्षाची, ज्ञातेपणाची, भक्तीसाम्राज्याची, यशाची, स्वानंदाची, सायुज्याची, वैराग्याची आणि निजधर्माची.

खरोखरच आपले उत्सव जर खऱ्या अर्थाने आपण समजून घेतले,उपयोगात आणले , सांभाळले तरच ते साजरे करण्यात अर्थ आहे. कारण उत्सव हे ऐक्याचे साधक, प्रेमाचे पोषक, प्रसन्नतेचे प्रेरक, धर्माचे संरक्षक आणि भावनांचे संवर्धक आहेत.उत्सव आपल्याला जीवन विकासात उपयोगी असे मूकसंदेश देतात. एक दिशा दाखवतात, दैनंदिनी जीवनात चैतन्य, उत्साह भरतात म्हणूनच उत्सव हे सर्वांनाच आवडतात.

सौ.आरती डिंगोरे, नाशिक.

९४०४६८७७२९

••••••••••

# उन्हाळ्यातला पळसवृक्ष



आला उन्हाळा उन्हाळा

पिऊ सरबत नि शहाळी

वसंतऋतुच्या आगमनाने

पानफुलांनी वाके डहाळी

उन्हाळा आला की वसंताचे आगमन होते. रस्त्याकडेच्या रोपट्यांना नि नानाप्रकारच्या वृक्षांना, पानाफुलांचा बहर आलेला दिसतो. डोंगरावरील हिरवे गवत उन्हांमुळे पिवळसर पडते. परंतु वृक्षवेली लतिकांची पानगळ होऊन नवी पालवी फुटलेली दिसते.

आला वसंत हासत नाचत

जणू सृष्टीचे मनोहारी रूप

हिरवीगार पाने वृक्षलतिका

रानमेवा मिळे खायला खूप

सूर्याच्या प्रखर उष्णतेने अंगाची काहिली होत असताना घनदाट पालवीच्या वृक्षाखाली बसून मडक्यातील थंडगार पाणीदेखील अमृताहुनी मधुर लागते. त्याचे वर्णन शब्दांत करता येणार नाही. दऱ्याखोऱ्यांतून छोटेसे निर्झर झुळझुळताना सृष्टीचे गीत गायल्याप्रमाणे भासतात. त्यांच्यामुळे जमिनीत आणि दऱ्याखोऱ्यात ओलावा टिकुन असलेला दिसतो. वसंत ऋतुच्या आगमनाने आम्रवृक्षाला मोहर येतो नि सारा परिसर सुगंधाने दरवळून जातो. लाल केशरी रंगाचे पळसवृक्ष फुलापानांनी बहरलेले, डवरलेले दिसतात. डोळ्यांना मनमोहक वाटणारे सृष्टीचे हे सौंदर्य जणू कॅमेऱ्यात टिपून घेण्याचा कुणालाही मोह व्हावा!

एकीकडे पानगळ झाल्याने झाडाखाली पडलेली पिवळीजर्द जीर्ण पाने वाऱ्याने इकडून तिकडे पळताना दिसतात. त्या वाळलेल्या पानांचा नाद कानांना खुळखुळ्यांप्रमाणे भासत असतो. साऱ्या परिसरात नवचैतन्य पेरणारा सृष्टीचा हा नजारा पाहून मनाला तजेला मिळतो. पळसाची तांबडी केशरी

फुले जणू अग्निशिखा असल्याप्रमाणे सूर्यकिरणांच्या प्रकाशात चमकतांना दिसतात. देवाने सढळ हाताने सृष्टीला बहाल केलेले हे सौंदर्य आपणास नेत्रदीपक न वाटेल तरच नवल! मोगरा, जाईजुई, चाफा आणि चमेलीचा सुगंध साऱ्या परिसराला गंधित करत असतो आणि रात्री चांदण्यात फिरताना रातराणी आपल्या सुगंधाने संमोहित करते.

उन्हाळ्यात उन्हांमुळे जीवाची तल्खली होत असली तरी नारळाच्या शहाळ्यांनी पोटाला तृष्णाशांती आणि आतील कोवळ्या खोबऱ्यामुळे क्षुधाशांती मिळत असते. उन्हाळ्यात रानमेव्यांपैकी

जांभळे, कैऱ्या, गाभूळलेल्या चिंचा, करवंदे, बोरे आणि हापूस खाण्याची मजा काही औरच! उन्हाळ्यात सूर्य प्रखर असल्याने दाट वृक्षांच्या छायेत पहूडण्याची आणि विहिरी,तलावात डूंबण्याची खूप मजा लूटता येते. पळसाची तळहाताएवढी रुंद आणि जाड दिसणारी पाने जेवणाच्या पत्रावळी आणि द्रोणासाठी वापरली जातात. त्यांच्या फुलांपासून रंग बनविला जातो. पळसाच्या कडू बियांना 'पळसपापडी' असे म्हटले जाते. पळसाची पाने तीनाच्या समूहात उगवतात. त्यातूनच 'पळसाला पाने तीन' ही म्हण प्रचलित झाली आहे. पळसाच्या खोड किंवा सालीच्या खाचातून लाल रस पाझरतो. तो सुकल्यावर विशिष्ट प्रकारचा गोंद बनतो.



कोवळी पाने किंवा खोडे मात्र लवदार दिसतात. पळसाची लालभडक फुले बिनवासाची असतात. पण दिसायला गोंडस ताजी फुले खूप छान वाटतात. त्यांचे आकार पोपटासारखे असल्यामुळे इंग्रजीत याला 'पॅरट ट्री' म्हणतात. पळस आयुर्वेदिक औषधांमध्ये शक्तिवर्धक म्हणून वापरला जातो. पळसाच्या सुकलेल्या तुकड्यांना 'समिधा' म्हणतात. पूजा आणि विवाह या मंगल प्रसंगी होमहवनमध्ये त्या टाकल्या जातात. त्यावरून संस्कृतमध्ये त्यास 'याज्ञिक 'म्हणतात. पूर्ण जगभर याची लागवड पाहायला मिळते. निरनिराळ्या ठिकाणी त्यांचे विविध उपयोग आढळून येतात.वसंत ऋतुत उगवणाऱ्या पळसाची नवलाई विशेष वाटते. तसेच ही पाने थंडीत गळून पडतात. नवीन पालवी एप्रिल अखेर येते.त्याच्या भडक रंगाने आकर्षित झालेले अनेक पक्षी फुलांतील मध लुटण्यासाठी झाडावर गर्दी करतात आणि परागीकरणाला सहाय्य करतात. अनेक कामांसाठी उपयुक्त असणारा पळस डोळ्यांना आकर्षित करतो आणि मनोवेधक वाटतो.

कवीच्या डोळ्यांना दिसतो

सौंदर्य असणारा हा पळस

लालभडक रंगांची फुलेही

भासती शेंड्यावरील कळस

सौ.भारती सावंत, मुंबई

9653445835

•••••••

# अलक.. अती लघु कथा

## १. माझं कुठे चुकलं ?

रस्त्यावरुन जातांना तिला छनछन असा छन्नी हातोड्याचा आवाज आला. तिने जाऊन बघितले तो एक शिल्पी दगडातून मूर्ती साकार करत होता. ती बघत राहिली. रोजच ती जातांना तिथे जायची आणि थोडा वेळ बघून यायची. तिला ते वेड लागले. शिल्पी आपल्या कामात मग्न असायचा. ती कृष्णाची मूर्ती पूर्ण झाली. तिची स्थापना मंदीरात होऊन त्या मूर्तीला देवपण लाभले. ती मूर्तीकाराच्या पाया पडली. तिच्या डोळ्यातून आसवं ओघळत होते.

'माऊली आपण कां रडता ?'

'आपण दगडातून देव साकार केला. मी मात्र मुलाला माणुसकी असलेला माणूस बनवू शकले नाही!'


मीना खोंड, हैद्राबाद

9703942425


————————————

## २. संस्कार

घर आवरता आवरता मुलगी आईला म्हणाली 'या जुन्या झालेल्या निरुपयोगी वस्तू फेकून देऊ ग आई .!'

आईला समोरच्या भिंतीवरच्या आरशात तिला तिचं रुप दिसलं ! थकलेला चेहऱ्यावर म्हातारपणाची झाक बघून ती एकदम दचकली!

'आई ऽ अगं ही देवाची मूर्ती, आजी आजोबांचा फोटो, हे सुरेख पेंटींग आणि ही पुस्तकं नाही फेकू शकत ! मला घडवणाऱ्या या वस्तू, माझी श्रद्धा, कृतज्ञता, माझं भावविश्व त्याच्याशी निगडीत आहे !'

आईने प्रसन्न मनाने मुलीकडे बघितले.


मीना खोंड

9703942425


————————————

महिलांकरिता आरक्षित असलेल्या सरपंच जागेकरिता तिला तिच्या पतीने नवडणूकीत उभे केले. त्याने भरलेल्या फार्मवर तिने सही केली. महिला रक्षण, शिक्षण, सन्मान आणि महिला विकास या त्याने तयार केलेल्या जाहिरनाम्यावर तिने सही केली. ती निवडून आली. सरपंच झाली. फक्त सहीपुरती!


मीना खोंड


——————————————

# कोरोना संपणार !




कोरोना आला आणि सर्वांच्या मनात भीतीमय वातावरण निर्माण करीत वाटचाल करता झाला. त्यातच या कोरोनानं अनेकांचे बळी घेतले आणि तो घेतच आहे. तो चीनमधून आला असला तरी आजही अख्खं जग त्याच्यामुळं धास्तावलं आहे. तसा तो फारच आग ओकत असल्याचे दिसते. कोरोनावर औषधी कंपनींनी औषधीही काढली आहे. पण कोरोना त्या औषधालाही घाबरायला खाली नाही. ज्याप्रमाणे आज आपण कोरोनावर औषध काढली. त्यालाच प्रतिबंध म्हणून कोरोनानं आपलं रूप बदलवलं व तो नवीन स्वरुपात खुलेआम वावरतो आहे. कोणाला न भीता. त्यामुळं तो न संपण्याची चिन्ह दिसत आहेत.

माणसे पाप करीत होते. कोणी कोणाला विनाकारण लुटत होते. कोणी कोणाचे गळे दाबत होते. कोणी बलत्कार करीत होते. कोणी कोणाच्या मालमत्ता दाबत होते. कोणी कोणाची जीवही घेत होते. महत्वाचं म्हणजे हे पाप करतांना माणसे नातेसंबंधही पाहात नव्हते. पाप करतांना माणसाला पुढला संभाव्य धोकाही दिसत नव्हता. तो आंधळा झाला होता. काही तर म्हणत होते. हे पापपुण्य म्हणजे काय ? काहीही पाप नसतं. पुण्यही नसतं. आजही असे काही महाभाग पापच करीत आहेत. ते कोणाला घाबरत नाही. कारण त्यांना आजही वाटतं की हे पाप कोणाला दिसत नाही. आजही असं पाप घडतं.

पाप हे घडत होतं. जे माणसाला दिसत नव्हतं. ते निसर्गाला दिसत होतं. अलिकडं देव नाही असे मानणारे बरेच लोक आहेत. ते देव मानत नाहीत. त्यामुळं त्यांच्यामध्ये भीती नावाची गोष्टच नाही. पण जे पाप......आपलं पाप........जे आपल्याला दिसत नाही, ते पाप निसर्ग पाहात असतो, त्याला ते सगळं दिसतं. ज्याला आपण परमेश्वर म्हणतो. कोणी त्याला अल्ला म्हणतात, कोणी देवही संबोधतात. ह्याच निसर्गानं कोरोना नावाचा आपला एक दूत पृथ्वीवर पाठवलाय. जे पृथ्वीवर पापाचं वजन झालं आहे, त्या पापाची छाटणी करायला नव्हे तर ते पाप संपवायला. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. पण गव्हाबरोबर सोंडाही भरडल्या जातो ना. तशीच आज काही पुण्यवानही या कोरोनाच्या कहरात मरत आहेत.

मृतकांची संख्या वाढत आहे. सगळे सुरक्षा बाळगून आहेत. काही तर चक्क संदूकात सीलबंद असल्यागत घरातच राहून काळजी घेत आहेत. कोणी काचेच्या महालात. जिथे हवेला शिरायलाही जागा नाही. अशीही कोरोनाच्या धास्तीनं जागा नव्हे तर पूरक वातावरण काहींनी आपल्या सभोवती संरक्षक भिंत म्हणून तयार केली आहे. पण कोरोना काही त्यांचं ऐकतो काय, तो त्याही व्यक्तीपर्यंत जात आहे आणि त्याला बाधीत करीत आहे. कारण तो पापाचा भागीदार आहे. तशी एक दंतकथा प्रचलीत आहे.

एक राजा होता. त्याला एका ज्योतीषानं सांगीतलं की तू आजपासून सातव्या दिवशी एक साप चावून मरणार. मग काय राजा घाबरला. त्यानं आपल्याला मृत्यू येवू नये, म्हणून आपल्याभोवती संरक्षक काचेची भिंत बांधली. जिथं हवेलाही प्रवेश नव्हता. कोणी विनामंजूरीनं त्याच्या कम-यात प्रवेश करु शकत नव्हता. त्यातच त्याचं जेवनही तपासून त्याला दिलं जात होतं. पण निसर्ग तो... त्या राजाचे पाप पुर्ण झाले होते की काय, आज सातवा दिवस होता. तपासणारे थकले होते. त्यांना त्या राजाबद्दल हसू वाटायचं. त्यातच एक लहानशी अळी बोराच्या आतमध्ये शिरली. तपासणा-यानं बारकाईनं तपासलं नाही व ती अळी आतमध्ये गेली. मग काय, राजानं बोराला स्पर्श केला. ते बोर खाण्यासाठी त्याला फोडलं तर ती अळी बाहेर पडली. ती मोठी झाली. ती एवढी मोठी झाली की तिचा आकार सापासारखा दिसू लागला. तिनं राजाला दंश केला व राजा मरण पावला.



अशीच एक कथा महाभारतातही आहे. आकाशवाणी झाली की देवकीचा आठवा पुत्र कंसाचा वध करणार. तसा कंस स्वगत म्हणाला,

'आठवा ना. वेळ आहे. तो जन्म घेईल तेव्हा पाहू. तोपर्यंत अभय देतो देवकीला.' त्यातच दुसरी आकाशवाणी.

'तो देवकीचा आठवा पुत्र पहिल्या लेकराच्या रुपानं जन्माला आला तर.......' आता कंस घाबरला. काय करावे सुचेनासे झाले. शेवटी त्यानं देवकेला कारागृहात टाकलं व तिचे सहाही लेकरं मारले.

महत्वपूर्ण गोष्ट ही की कोणी कितीही संदूकात सीलबंद जरी राहिला तरी कोरोना त्याचेजवळ पोहोचणार नाही कशावरुन ? किती प्रमाणात तुम्ही काळजी घ्याल. असे म्हणत काही माणसं बिनधास्त फिरत आहेत. असाच एक व्हिडीओ व्हाट्सअपवर गाजत आहे. कोणी खर्रा खाल्ला म्हणून मास्क वापरला नाही असं म्हणत आहे. तर कोणी चेह-यावरचा मेकअप मिटतो म्हणून मास्क वापरला नाही असे म्हणत आहे. कोणी मिशी वाकडी होते म्हणून मास्क वापरला नाही असे म्हणत आहे. कोणी पायी चालत आहो ना, गाडीवर मास्क वापरावा असे म्हणत आहे. परंतू मला हे म्हणायचे आहे की कोरोना दस्तक देवो की न देवो. कदाचित कोरोना त्या तरुणांना शिवतही नसेल कदाचित. कारण त्यांचं मन निरोगी असेल, त्यांच्यात प्रतिकार शक्ती जास्त असेल, पण त्यांच्यारुपानं जो कोरोना इतरांमध्ये पसरतो ना. ते बरोबर नाही.

आज सरकार लाकडाऊन लावतं. कशासाठी ? तर कोरोना संपावा म्हणून. तरीही मजूर वर्ग बिनधास्त बाहेर पडत आहे. त्या वर्गाला वाटते की आपल्याला कोरोना काय, कोणताही आजार शिवणार नाही. त्यांचं म्हणणं बरोबर आहे. कारण त्यांची प्रतिकार शक्ती जास्त आहे. त्यांनी बहुतःश

पापही केलेलं नसतं. कोणाची मनंही दुखावली नसतात. म्हणून कोरोना शक्यतोवर त्यांना शिवणारच नाही. पण ह्या कोरोनाचे ते नक्कीच वाहकही ठरु शकतात. त्यांच्याच शरीरावरुन ते कोरोनाचे जंतू पसरु शकतात हे काही नाकारता येत नाही.

विशेषतः कोरोना कोणाला छळतो. कारखान्याचे जे मालक असतात. ते मालक आपल्या मजूरांवर अत्याचार करीत असतात. ते मात्र एसीच्या कम-यात असतात. घरात काम करणा-या मोलकरणीवर घरातील लोकं अत्याचार करतात. ते स्वतः एसीत असतात. सरकारी कार्यालयात कर्मचा-यावर अधिकारी अत्याचार करीत असतात. मात्र ते स्वतः एसीत बसतात. सरकारी योजनेची घोषणा करणारे मंत्री शेतकरी, श्रमीकावर अत्याचार करतात, ते स्वतः एसीत फिरतात. तसेच लहानशा प्रमाणपत्रासाठी दररोज शाळेत येणा-या चिमुरड्या मुलांवर शाळेत जाण्यासाठी तगादा लावणारे पालक तसेच शाळेत येण्यासाठी तगादा लावणारे शिक्षक, जे मुलांचं स्वातंत्र्य हिरावतात. कोरोना त्या मुलांना होत नाही. त्याच्या पालकांना व शिक्षकांना होतो. कारण याच घटकांकडून या निरागस मनावर अत्याचार होतो.




कोरोना संपणारच. कधीतरी संपणारच. कारण जो जन्म घेतो, तो मरणारच. अर्थात कधीतरी संपणारच. हा निसर्गनियम आहे. तेव्हा महत्वाची गोष्ट ही लक्षात घेण्याजोगी आहे की आपण आजपर्यंत जेही काही केलं, ते सर्व विसरुन जावे. चांगले वागावे. आपले विचार चांगले बनवावे. षडविकार आपल्यातून काढून टाकावे. दुस-याबद्दल चांगली भावना ठेवावी. दयाभाव ठेवावा. आदर बाळगावा. दुस-या व्यक्तीबद्दल चांगूलपणा बाळगावा. तो शत्रू का असेना. तसेच माणूसकी बाळगावी. मास्क वापरावा. जेवनापुर्वी हात स्वच्छ धुवावे. कोणीही अत्याचार करु नये. अत्याचाराचा भावच मनात आणू नये. निंदानालस्ती करु नये. मनात भीती, राग, लोभ, द्वेष, मद, मत्सर ठेवू नये. असे जर तुम्ही वागले तर कोरोना हरेल व तो आल्यापावली निघून जाईल. पण हे प्रत्येकानं करण्याची गरज आहे, एकानं नाही. कारण कोरोना व्हायरस हा एक निसर्गदत्त जंतू आहे. या जंतूला जेवढे तुम्ही घाबराल, तेवढा हा सतावणारच आहे. त्यासाठी औषध म्हणजे स्वतःच्या मनात चांगूलपणा आणून तो चांगूलपणा आत्मसात करण्याची गरज आहे. आपण पाहात आहोत की कोरोना औषध निघाल्या. तरी कोरोना संपायचं नावच घेत नाही. तो अजून वाढत आहे. कधी नव रुप घेवून येत आहे. तर कधी त्याच रुपात कहरचा वर्षाव करीत आहे. मात्र आपण आता कसं वागावं हे आपल्यावरच अवलंबून आहे. हे तेवढंच खरं आहे.

अंकुश शिंगाडे नागपूर

९३७३३५९४५०

# वेळ !



क्षणात होत्याचं नव्हतं करणारी ! राजाला रंक आणि रंकाला राजा करणारी. वाट पहायला लावणारी हीच ती वेळ .

समय बडा बलवान होता है !

वेळ कोणासाठीही कधी थांबत नाही. आपल्याला सर्वांना आर्य चाणक्य व चंद्रगुप्त मौर्य चा इतिहास माहित आहे. नंदवंशाने भर दरबारात आर्य चाणक्याचा अपमान केला. त्याच वेळी चाणक्याने प्रतिज्ञा केली की मी नंदकुळाचा नाश करीन व त्यांचे राज्य नामशेष करीन. काळ आणि वेळेचा योग्य वापर करून चाणक्याने नंदवंशाची राजवट संपविली व चंद्रगुप्त ला गादीवर बसवून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली !

वेळेचा महिमा आगाध आहे. तीचा सदुपयोग करुन घेता आला पाहिजे. आजच्या तरुण पिढीचा विचार केला तर ती जास्तच बेफिकीर होत चालली आहे. कुंभार जसा मातीला आकार देऊन त्यांची सुंदर वस्तू बनवतो. तसा आपण आपल्या आयुष्याला आकार दिला पाहिजे.

निघून गेलेला दिवस, निघून गेलेली वेळ परत कधीच येत नाही मग काही लोक तिला पकडायला आयुष्यभर तीच्या मागे फरफटत जातात पण ती काही हाती लागत नाही .

वेळेचे व्यवस्थापन करण्याची सवय विद्यार्थी दशेपासूनच लागायला पाहिजे. चांगल्या मार्कांनी पास व्हायचे असेल तर अभ्यासाचे वेळापत्रक बनवून कोणत्या विषयाला किती वेळ द्यायचा यांचे नियोजन केले तर हमखास तो विद्यार्थी घवघवीत यश प्राप्त करतो. नौकरी व्यवसायात ही वेळेचे योग्य नियोजन केले तर वेळच्या आधी त्या कामाचा निपटारा होतो व बॉस च्या बॉसगीरी पासून सुटका होते.

निवृत्त झालेल्या जेष्ठ नागरिकांनी तर वेळेचे व्यवस्थापन जरुर केले पाहिजे. आनंदी समाधानी जीवन जगण्यासाठी, तणावमुक्त जगण्यासाठी वेळेचे नियोजन फार उपयोगी पडते.

नौकरी वर असताना वाटेल तसा पैसा खर्चला. मौजमजा केली पण बचत केली नाही. मुलाबाळांच्या शिक्षणासाठी काही तरतूद केली नाही. निवृत्ती नंतरच्या आजारपणासाठी पैशाची बचत केली नाही. आता हातपाय थकले आजारपणासाठी लोकांच्या हाताकडे बघायची वेळ आली. त्यासाठीच लहानपणी शाळेत शिस्त, स्वावलंबनाचे धडे गुरुजी देत असतात. त्याचा तुम्हाला आयुष्यात पुढे उपयोग व्हावा म्हणून.

परिक्षेला एक महिना राहिला की विद्यार्थी जागे होतात. मग रात्र रात्र जागून अभ्यास करतात. अति जाग्रणाने आरोग्यावर परिणाम होतो. पेपर लिहायच्या वेळी डुलक्या खातो, ऐनवेळी काय लिहायचे ते देखील विसरतो. परिणामी मार्क कमी पडतात मग नशिबाला दोष देणे सुरू होते. किंवा आपल्या अपयशाचे खापर आई वडिलांवर फोडले जाते.

मी नौकरीत असताना माझा एक मित्र होता. तो नेहमी म्हणायचा यार मला या नौकरीचा कंटाळा आलाय. दुसर्यांची ताबेदारी नको वाटते. आपला स्वतः चा छोटा मोठा व्यवसाय करावा. धंदा, व्यवसायात आपले मालक आपण असतो. वाटेल तेव्हा करावा, वाटेल तेंव्हा सुट्टी घ्यावी. कोणाची बॉसिंग नाही, कोणाची ताबेदारी नाही. आणि महिनाभर नौकरी करुन महिन्याच्या शेवटी ठराविक रक्कम हातात पडते. व्यवसायात रोजच पैसा येतो. हे त्यांचे बोलणे ऐकून मी म्हणालो ‘तू कोणता व्यवसाय करायचे ठरविले आहेस ? तर मित्र म्हणाला अजून ठरवले नाही, विचार करायला थोडा वेळ पाहिजे. पुन्हा सहा महिन्यांनी भेटल्यावर त्याला विचारले अरे काय झाले तुझ्या व्यवसायाचे ? ठरवले का कोणता व्यवसाय करायचा तो ? सध्या भांडवल नाही, अजून ती वेळ आली नाही.

पुन्हा काही दिवसांनी त्याला व्यवसायात बद्दल विचारले तर म्हणतो, आता पैसा आहे पण मार्केट डाऊन आहे. धंदा चालणार कसा ? अजून थोडी वाट पाहायचे ठरवले आहे. दरम्यान नौकरी वर दुर्लक्ष होत गेल्यामुळे वारंवार सुचना देवून ही कामात सुधारणा होत नसल्यामुळे वरीष्ठांनी त्याला कामावरून काढून टाकले आणि आता त्याच्यावर आणि त्याच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली.

योग्य वेळ येण्याची वाट पाहाता पाहाता हातातली आलेली संधी सोडयाची नसते. मराठीत एक म्हण आहे. हातचं सोडून पळत्याच्या मागे लागू नये नाहीतर तेल ही गेले आणि तूप ही गेले, हाती आले धुपाटणे अशी गत होते.

हेतू शुद्ध असेल तर कुठलीही वेळ योग्य च असते. त्या वेळेचा कुशलतेने योग्य वापर करुन आपण आपली प्रगती करुन घ्यावी. योग्य वेळेची वाट पहात वेळ घालवू नये.

‘हीच ती वेळ’ म्हणून कामाला लागावे.

TIME IS MONEY अशी इंग्रजी म्हण आहे.

शुभस्य शिघ्रम !

अरविंद कुलकर्णी, पिंपरखेडकर 9834114379

# डॉ बाबासाहेब आंबेडकर



लाखो देशभक्तांच्या बलिदान व संघर्षानंतर आपला भारत देश १५ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला व त्यानंतर देशाने संसदीय लोकशाही मान्य केली. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फार मोठे योगदान भारतीय संविधान निर्मिती मध्ये आहे.म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून भारत व जग ओळखते . दिनांक २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधान अंमलात आले. त्या दिवसापासून भारत सार्वभौम लोकशाही राष्ट्र म्हणून जगभर ओळखले जाऊ लागले. या कालावधीत भारताने अनेक चढ-उतार पाहिले आहेत.ताठ व स्वाभिमानाने जगात भारत अखंड उभा आहे.नुसता उभाच नाही तर प्रगतीच्या शिखरापर्यंत पोहोचत आहे.नामवंत देशांच्या बरोबरीने प्रगतीपथावर आहे. शेती ,औद्योगिक, विकास ,वैज्ञानिक, व्यापारी, अंतराळ, तंत्रज्ञान, शिक्षण, बांधकाम या क्षेत्रातही जोमाने ध्यास घेऊन आपला भारत देश विकास करीत आहे. हे सर्व भारतीय संविधानामुळे शक्य झाले आहे.भारतीय संविधान हा देशाचा कायदा आहे. संविधानामध्ये शासन पद्धत, नागरिकांची कर्तव्य व जबाबदारी सांगितली आहे. संविधानाने व्यक्तीचे मूलभूत अधिकार ठरवून दिलेले आहेत.सामाजिक परिवर्तनाची तत्वे नमूद केली आहेत.स्वातंत्र्य, समता ,बंधुता व धर्मनिरपेक्षता भारतीय राज्यघटनेची मजबूत चौकट आहे.

महान घटनाकार, कायदेपंडित, थोर राजकीय विचारवंत, जागतिक कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ, मानवी हक्कांचे कट्टर पुरस्कर्ते, समाज सुधारक, स्त्रियांचे कैवारी, शोषितांचा मुक्तिदाता म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपणा सर्वांना सुपरिचित आहेत.सामाजिक क्रांतीचे अग्रदूत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अभ्यास ,चिंतन, मनन व मंथनातून भारतीय राजकारणाला, समाजकारणाला दिशा देण्याचा असामान्य प्रयत्न केला.भारतीय लोकशाही बाबत डॉक्टर आंबेडकर यांनी मांडलेले विचार आजही मार्गदर्शक आहेत.संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांची निवड करण्यात आली होती.सर्वानुमते मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती करण्यात आली होती.ते जागतिक कायदेपंडित असून साऱ्या जगातील घटनांचा त्यांचा गाढा अभ्यास होताच पण कायदा,समाजशास्त्र,अर्थशास्त्र ,राज्यशास्त्र यावर प्रभुत्व असणारा विद्वान आणि देशाच्या घटनेने सारखं कठीण आणि अति महत्त्वाचं काम केवळ आणि केवळ तेच करतील, असे समितीतील जाणकारांच्या लक्षात आले, आणि म्हणून संपूर्ण राज्यघटना निर्माण करण्याची जबाबदारी एकट्या डॉ.आंबेडकरांवर येवून ठेपली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील अनेक राज्य घटनांचा सखोल अभ्यास करून जगातील सर्वात मोठे व सर्वश्रेष्ठ असे संविधान की ज्या संविधानाला सात ते आठ वर्षे लागणार होते ,ते संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिवस-रात्र एक करून ,स्वतःच्या तब्येतीकडे दुर्लक्ष करून

,दोन वर्षे ११ महिने १७ दिवसात पूर्ण केले व दिनांक २६ नोव्हेंबर १९४८ ला आपल्या देशाला बहाल केले. पुढे ते संविधान २६ जानेवारी १९५० पासून अमलात आणले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तिपूजेचे नाकारलेले आहे. कारण हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे असे त्यांचे मत होते व त्याच ठिकाणी लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी समान तत्त्वास जास्त महत्त्व दिलेले आहे.त्याबाबत डॉक्टर आंबेडकर म्हणतात जर आपण दीर्घकाळ समता देण्यास नकार देत राहिलो तर आपण आपली राजकीय लोकशाही धोक्यात घालून जे लोकशाही जे संसदीय लोकशाहीचे जतन करणे व संविधान सर्व जनतेने समजून घेणे गरजेचे आहे म्हणून भारताचे संविधानाचे वाचन घराघरात करून त्याचे पावित्र्य राखू असा आपण संकल्प केला पाहिजे.

पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या मंत्रीमंडळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री होते. त्यांनी आपला स्वाभिमान कधीही सोडला नाही.भारतीय संसद फक्त दोनच व्यक्तींसाठी उठून उभे राहून मान देत असे, त्यातील पहिले पंडित जवाहरलाल नेहरू ते प्रधानमंत्री होते म्हणून आणि दुसरे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कायदा मंत्री होते म्हणूनच नाही तर महाविद्वान, महाशीलवान,थोर राजकीय विचारवंत , मानवी हक्कांचे पुरस्कर्ते व जागतिक कीर्तीचे कायदेपंडित होते म्हणून.

सन १९५० मध्ये भारतीय राज्यघटनेचा अंमल सुरु झाला तेव्हा सामाजिक परिवर्तनाची जबरदस्त प्रक्रिया देखील सुरू झाली. प्रामाणिकपणा आणि बुद्धी शिवाय मोठेपणा प्राप्त होत नाही.जोपर्यंत हृदय आणि बुद्धी एकत्र काम करत नाही तोपर्यंत राजकीय आणि धार्मिक स्वातंत्र्य देऊ शकत नाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली प्रचंड बुद्धिमत्ता खर्च करून देशाची राज्यघटना बनवली आहे. आपल्या भारत देशात हिंदू, मुस्लिम, शीख ,ईसाई ,बौद्ध ,लिंगायत ,पारशी, ख्रिश्चन असे अनेक धर्माचे जातीचे पंथाचे अनेक भाषा बोलणारे लोक एकमताने व एक दिलाने राहतात .हे सर्व संविधानाचे फलित आहे. समाजामध्ये निकोप वातावरणा साठी बंधुता असणे आवश्यक आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व , न्याय व धर्मनिरपेक्षता या आधार तत्वांची पेरणी भारतीय संविधानाच्या मुळेच आहे. या तत्त्वांना अनुसरून अपेक्षित नागरिक तयार होण्यासाठी, व्यक्ती_व्यक्तीतील व राष्ट्र_राष्ट्रांतील संबंध सलोख्याचे होण्यासाठी, माणसाने माणसाशी माणुसकीने वागण्याची शिकवण संविधान देते. संविधान माणसाला प्रज्ञावंत ,नीतीमान ,चारित्र्यवान, शीलवान, सदाचारी बनवते .तसेच जाती, धर्म ,पंथ, भाषा प्रांत, लिंग यासारख्या भेदातून माणसाला मुक्त करण्याची शिकवण संविधानातूनच मिळते. संविधानातील धर्मनिरपेक्षता या तत्त्वामुळे भारताला जगात बहुमान प्राप्त होत आहे.जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशाच्या संविधानाचा सन्मान जगातील राष्ट्रे स्वाभिमानाने करतात. धर्मनिरपेक्षता म्हणजे राज्याचा स्वतःचा कोणताही धर्म नाही. राज्य ही निधर्मी आहे. संविधानाने प्रत्येक व्यक्तीस त्याच्या इच्छेनुसार व विवेक बुद्धीनुसार धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे आणि याचे सर्व श्रेय डॉ. आंबेडकरांकडे जाते.

कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उभारणी करून पुतळ्याच्या दर्शनी भागात लिहिले आहे , ‘The symbol of knowledge‘ आणि त्याच कार्यक्रमात अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरां बद्दल असे उद्गार काढले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेत जन्माला आले असते तर आम्ही त्यांना सूर्य संबोधले

असते.इतकेच नाही तर त्यावेळी असलेले तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा हे भारताच्या दौऱ्यावर होते, त्यावेळेस त्यांनी भारतीय संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये असे म्हटले की,'भारताची लोकशाही पुढील हजारो वर्ष अबाधित राहील ,कारण या देशाचे संविधान डॉ. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्वातून आणि दूरदृष्टीतून जन्माला आलेले आहे , भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे.'

संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान सभेतील दिनांक १७ डिसेंबर १९४६ चे भाषण समजून घेण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब म्हणतात,'सत्ता हाती आली म्हणून तिचा अविचाराने किंवा स्वार्थाने वापर करता कामा नये, बळाचा वापर करून कोणालाही फार वेळ आपल्या अधिपत्याखाली ठेवता येत नाही. सत्ता देणे सोपे आहे परंतु शहाणपण देणे कठीण आहे.तेव्हा देशातील सर्व घटकांना आपल्यासोबत नेण्याचा व एकते कडे जाण्याचा मार्ग अवलंबला पाहिजे. तरच भारत हा एकसंघ राष्ट्र म्हणून उभा राहील'. आपला भारत देश प्रजासत्ताक देश आहे. देशाचे लोक सार्वभौम आहेत. म्हणून लोकांमध्ये संविधानाची जीवनमूल्य रुजली गेली पाहिजेत. त्यातून आपली लोकशाही समृद्ध होईल. संविधान माणसाला प्रज्ञावंत, नीतीमान, चारित्र्यवान ,शीलवान ,सदाचारी बनवते.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताच्या लोकांनी भारताचे संविधान अंगीकृत व अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण केलेले आहे. संविधान निर्मितीच्या इतिहासातील जगाच्या पाठीवर ही अद्भुत अशी घटना आहे.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक प्रयत्नांनी देशाला मिळाले आहे.संविधानाच्या प्रास्ताविकेचे याचा उल्लेख आहे. म्हणून प्रास्ताविकेचे वाचन करून ते समजून घेणे,अंगीकरण करणे तसेच संविधान कायद्यानुसार वर्तन करणे आवश्यक आहे .

श्रीमती मेघा अनिल पाटील.

उपशिक्षिका

श्रीमती पी ए सोढा सार्वजनिक मराठी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नवापूर. जिल्हा नंदूरबार. पिन ४२५४१८ .

मोबाईल 9665189977

Email patilmeghaa@gmail.com

संदर्भ__

(१) प्रशासनातले समाजशास्त्र. - लेखक_मा. श्री. इ .झेड. खोब्रागडे.

(२) शिक्षण संक्रमण मासिक नोव्हें.२०१४ - लेख_भारताचे संविधान - लेखक _श्री गोवर्धन सोनवणे.

-----------------

# डॉक्टर आंबेडकर आणि समाज परिवर्तन

उषःकाल होता होता

काळ रात्र झाली

अरे पुन्हा आयुष्याच्या

पेटवा मशाली........



डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर एक महान पुरुष, अतिशय बुद्धिमानी. त्यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी महू (इंदूर) येथे झाला. त्यांचे वडील रामजी सपकाळ हे लष्करामध्ये सुभेदार होते. लष्करातील नोकरी सोडल्यानंतर ते कोकणातील दापोली येथे आले. तेथून ते सातारा येथे स्थायिक झाले. शाळेत अस्पृश्य म्हणून इतर मुले डॉक्टर आंबेडकरांना स्वतःजवळ फिरकू देत नसत. अस्पृशया वर होणारा अन्याय ,अत्याचार त्यांनी लहानपणापासूनच सहन केला होता.लहानपणी त्यांना काही उमजत नव्हते. उदाहरणार्थ विहिरीवर पाणी भरू न देणे, गावच्या बाहेर झोपडीत राहणे इत्यादी. अस्पृश्यता म्हणजे जीवन जगण्यास नकार. एका माणसाने दुसऱ्या माणसाला समाजात मुक्तपणे वावरण्यास दिलेला नकार.

प्राथमिक शिक्षणानंतर त्यांनी सरकारी हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. तेथेही महारपण आडवे आले. त्यांना तुच्छतेने वागणूक दिली जात असे. पण त्यातूनही एकटेपणाचा त्यांना फार फायदा झाला. त्यांनी पुस्तकांना आपले मित्र बनविले. शाळेत आंबेडकर गुरुजी फार चांगले होते.त्यांनी डॉक्टर आंबेडकरांचे सपकाळ हे आडनाव बदलून स्वतःचे आंबेडकर हे आडनाव त्यांना लावले. त्यांचे हायस्कूलचे शिक्षण मुंबई येथे झाले. एक महार मुलगा मॅट्रिक झाला, या बातमीने तर सर्वत्र खळबळ माजली. ठिकठिकाणी त्यांचा सत्कार झाला. त्यानंतर कोलंबिया विद्यापीठात त्यांनी एम. ए. ला अर्थशास्त्र विषय घेतला. नंतर त्यांनी पीएचडी पदवी सुद्धा घेतली. भारतीय समाजाने त्यांना बहिष्कृत केले होते, तरीदेखील सामाजिक परिस्थितीला तोंड देत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पैशाच्या अभावी त्यांना पुन्हा भारतात यावे लागले.परंतु कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांच्या पैशाची मदतीने ते पुन्हा विलायतेला गेले. व तेथे एम एस सी इकॉन व डी एस सी इकॉण आणि बार. ॲट. लॉ. या पदव्या संपादन केल्या.

डॉक्टर आंबेडकर यांनी महाड येथे चवदार तळ्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह केला. त्याचप्रमाणे देवळात प्रवेश मिळावा म्हणून नाशिक येथे सत्याग्रह करण्यात आला.

अस्पृश्य ते विषयी त्यांनी सामाजिक लढा दिला, ठराव संमत केले. विचार परिवर्तनाची धुरा चालविली. अस्पृश्यता दूर झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही अशा मताचे ते होते. भारतीय

घटनेतील आराखड्यात त्यांनी मांडलेल्या मुद्द्यांना कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. राज्य घटना बनविण्याची सर्वात मोठी जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली होती. म्हणून त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणतात. 14. 10. 1956 ला त्यांनी नागपूर येथे हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारला.

आज रूढी-परंपरा बदलवून टाकून अस्पृश्य हा शब्द समाजातून निघून जावा यासाठी डॉक्टर आंबेडकरांनी आपले संपूर्ण जीवन खर्ची घातले.

तेजस्वी व्यक्तिमत्व, शिस्त, वक्तशीरपणा, अभ्यासू वृत्ती, इत्यादी गुणांनी परिपूर्ण डॉक्टर आंबेडकरांनी समाज परिवर्तन करण्यात मोलाचा वाटा दिलेला आहे. त्यांनी शिक्षण क्षेत्राप्रमाणेच सामाजिक क्षेत्रातही बहुमोल कामगिरी केली आहे.

अशा या क्रांतीसुर्य मानवाचा मृत्यू 6 डिसेंबर 1956 ला झाला. साऱ्या देशात शोककळा पसरली. म्हणून 6डिसेंबर महापरि निर्वाण दिन म्हणून साजरा केला जातो.

अशा महामानवास माझा कोटी कोटी प्रणाम.

'सागराचे पाणी कधी

आटणार नाही भिमराया

भारतीय संविधान दिले देशाला

तुझे कार्य जाणार नाही वाया.'

सौ.भारती दिनेश तिडके

रामनगर, गोंदिया.

8007664039 / 7020756845

-------------

# महात्मा ज्योतिबा फुले



ज्योतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

येत्या ११ एप्रिलला महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती.

मागच्या वर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा त्यांची ही जयंती साजरी करायची आहे. कोरोनाने आपल्यावर आणलेल्या संकटाचा सामना करत सारे काही योग्य खबरदारी घेत आपण आपल्या स्तरावर पार पाडत असतो यात शंकाच नाही. याप्रसंगी मी ज्योतीबा फुले यांच्या विषयी थोडक्यात व्यक्त होण्याचा प्रयत्न करत आहे.

स्त्री शिक्षणाचे आद्यजनक, क्रांतीसुर्य ज्योतीबा फुले यांचे पूर्ण नाव ज्योतीराव गोविंदराव फुले. ते महात्मा या नावाने प्रसिद्ध आहेत. ते एक यशस्वी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण येथे झाला. वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई. ते केवळ नऊ महिन्याचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी झाला.

प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजीविक्रीचा व्यवसाय केला. १८४८ मध्ये पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. ते अभ्यासात अतिशय हुशार आणि तल्लख बुद्धीचे असल्यामुळे पाच सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. शाळेतील शिस्तप्रिय व हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याती होती.

विद्येविना मती गेली

मतीविना नीती गेली

नीतीविना गती गेली

गतीविना वित्त गेले

वित्तविना शुद्र खचले

इतके अनर्थ एका अविद्येने केले !!

या ओळी शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रसिद्ध आहेत. समाजातील अज्ञान, दारिद्र्य आणि जातीभेद पाहून त्यांनी सामाजिक परिस्थिती सुधारण्यास आजीवन कष्ट घेतले. १८४८साली पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली आणि शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीवर सोपविली. फक्त स्त्रियांसाठी शाळा काढणारे ते पहिले जनक भारतीय ठरले. त्यांच्या चरणी मानाचा मुजरा. शतशः नमन.

त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकरी त्यांची दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता लिहिली. नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे हा विचार ज्योती रावांनी मांडला.

माणसाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. २४ सप्टेंबर १८७३ साली त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता दूर करून तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचविणे. हे त्याचे ध्येय होते. एखादे चांगले काम पूर्ण करण्यासाठी वाईट उपायांचा वापर करू नये. जीवनात तुमच्या दोन चाकांवर गाडी धावत नसते. साखळीत साखळी गुंतल्याशिवाय गती मिळत नसते. तोडताना एक घाव पुरतो, जोडताना किती भाव मोजावा लागतो. हे त्यांनी पटवून दिले. स्वातंत्र्य आणि समान संधी ही मानवाची गरज आहे. स्वातंत्र्याशिवाय कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संपूर्ण विकास होऊच शकत नाही. समाजाच्या विकासासाठी हे आवश्यक आहे. म्हणून समाजात एकता आणि समानतेचे अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अशा या थोर विभूतीचा मृत्यू २८ नोव्हेंबर १८९० साली झाला. जनतेने त्यांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली. ध्येयवादी माणसे प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला तेच पोहू शकतात .त्यांच्या पत्नी सावित्रीबाई खांद्याला खांदा लावून अहोरात्र झटत राहिले. खरच.... सावित्री ज्योती आभाळाएवढी माणसं होती....!!

म्हणावे ते अबाधित, त्रिकाल सत्य आहे.


पुनश्च त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन.



सौ. किरण पुरुषोत्तम कावळे
गोरेगाव, जि.गोंदिया
९३७०५३९०९३

# पुस्तक परिचय

## ‘ति’च्या आणि ’त्या’च्या सहअस्तित्वाचा शोध – ‘अनिमा अनिमस’




‘स्त्रियः सतीस्तां उ मे पुंस आहूः

पश्यदक्षण्वान्न बिचेतदन्धः’

ऋग्वेदाच्या अस्यवामीय सुक्तामध्ये असा एक श्लोक वाचायला मिळतो. त्याचा अर्थ असा की प्रत्येक पुरूषामध्ये एक स्त्री असतेच असते. ती ज्याला दिसत नाही तो आंधळा आहे असे समजावे. पुढे जाऊन कार्ल गुस्टाफ युंग हा जगप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ हाच सिद्धांत जणू अधिक शास्त्रीय आणि व्यापक स्वरूपात मांडतो. तो असं म्हणतो की प्रत्येक पुरूषाच्या मनात कुठेतरी खोलवर एक स्त्री जिवंत असते. आणि प्रत्येक स्त्रीच्या मनात एक पुरूषही जिवंत असतो. पुरूषाच्या आत दडलेल्या स्त्री अंशाला युंग ’अनिमा’ असे म्हणतो तर स्त्रीच्या आत वसलेल्या पुरूष अंशाला तो ’अनिमस’ असे संबोधतो. युंगने आपल्या विश्लेषणात्मक मानसशास्त्रात ’त्याच्या’मधल्या ’ती’ ला आणि ’तिच्या’मधल्या ’त्या’ला खूप महत्त्व दिलंय. कार्ल युंगच्या सिद्धांताची आठवण करून देणारा ’अनिमा अनिमस’ नावाचा काव्यसंग्रह नुकताच वाचण्यात आला. पाचोरा जि.जळगाव येथील प्रतिभावंत कवी कृपेश महाजन यांचे चपराक प्रकाशन, पुणे यांनी हे पुस्तक प्रकाशित केलेले आहे.

१०४ पृष्ठसंख्या असलेल्या या संग्रहात आपल्याला एकाहून एक सरस, आशयघन आणि काहीशा गुढ वाटणाऱ्या कविता आपल्याला वाचायला मिळतात. गुढ यासाठी की यातल्या कवितांमधून उभ्या केलेल्या कित्येक प्रतिमा, कित्येक प्रतिकं ही केवळ वाचून उमगत नाहीत . त्या समजण्यासाठी प्रतिमांच्या तळाशी जावं लागतं, त्यासाठी प्रत्येक कवितेत खोल बुडी घ्यावी लागते. काही वेळा तळात थिजलेलं काही हाताला लागतं. तर काही वेळा जीवही गुदमरतो. अर्थात ज्यांना आशयसंपन्न कवितांच्या डोहात पोहण्याची इच्छा आहे त्यांनी कृपेशच्या कवितांमध्ये स्वतःला झोकून द्यावं.

‘अनिमा अनिमस’ च्या अर्पणपत्रिकेपासूनच कवी त्याच्या-तिच्यातला एकात्मभाव वाचकांच्या मनात पेरायला सुरूवात करतो. त्यानंतर या पुस्तकाचं एकेक पान उलटत असताना आपल्याला जाणवत राहतं की आपण कृपेशने कोरलेल्या प्रतिमा प्रतिकांच्या गुहेत कुठेतरी खोल खोल जात आहोत. असं हरवणं फार काळ टिकू नये यासाठीच की काय, कवी पहिल्याच कवितेत म्हणतो, ‘पार्थिवावर जास्त वेळ दवडू नये, दूर लक्ष्यी माणसाचं हे लक्षण नव्हे !’

खरंतर पुस्तकं, पुस्तकाचं वाचन हा सगळा शब्दांचा व्यवहार पण कवी म्हणतो,

‘शब्द खाऊन जगता येत असतं

तर कधीच झालो असतो आपण गलेलठ्ठ!

पण साली जीभ असते गांडू.. तोंडातली!

ना गिळता येते, ना ओकता येते!’

आणि या ओळी वाचल्यानंतर आपण नकळतच आपली जीभ चावतो. असं काही लिहिणं कुठून येत असावं? कुठून म्हणजे काय, लेखणीला ती दृष्टी असावी लागते. म्हणूनच कवी म्हणत असावा,

‘डोळा ही कविता झालीय की,

कवितेनं डोळा दिलाय

ते तरी सांग एकदा!’

हा कवितेचा तिसरा डोळा कृपेश महाजनांना प्राप्त झालाय याची प्रचिती पानोपानी येत राहते. अशाच एका पानावर ते म्हणतात,

‘फुलांना बोलता येत नाही

आणि हा अवकाळी बहर

खूनाचा पुरावा मानला जात नाही!’

त्याच्या तिच्या नात्यातले सहअस्तित्वाचे पुरावे देताना कवी अफलातून प्रतिकांच्या फायलीच्या फायली वाचकांसमोर मांडत जातो. आणि वाचकमन केव्हा कवीच्या प्रतिभेपुढे आपली केस सरेंडर करतं हे त्याच्याही लक्षात येत नाही. कारण हा कवी स्वतःच्या शब्दांना विषयांत जखडून ठेवत नाही. तो पौरूषावर बोलतो, पुरूषी मानसिकतेच्या नागवेपणावर आसूड ओढतो, तो तिच्या नि त्याच्या डीएनएचं विश्लेषण करतो, तो उत्क्रांतीची चिरफाड करतो, तो प्रत्येक कवितेतून शोधत राहतो पुरूषातून हरवत चाललेलं माणूसपण. ते त्याला गवसतं कुठेतरी जरासं तेव्हा तो म्हणतो,

‘सये, माझ्या पिसाऱ्यात एक जाळीदार पिंपळपान जडव

तुझ्या वहीत दडवलेलं तुझ्या मेघाच्छादित मनस्पर्शाने

माझा पिंपळमोर झालाय!’

तर अशा ह्या अमृततुल्य वेदनांना शब्द देणाऱ्या कविता. या आशयघन आहेत. गूढ आहेत. काही कविता सहज हाताला लागतात. बऱ्याचशा चकवतात. पण चुकवू नयेत कधीच.

‘माझ्या मांडीवर डोकं ठेवून झोपताना

तू म्हटलीस मला

मला तुझं बाळ व्हायचंय म्हणून

अन् अचानक छाती ओलावली’

अशा शब्दांत कवी शोधत राहतो ‘त्याच्या’ मनातल्या ‘तिला’. ती गवसते, अन् हरवतेही. कवितेची शोधयात्रा संपत नाही. कारण कवीचा ‘हा समागम विचारांशी आहे’. तोही कुठवर? तर ‘चिंतनाचं मूळ भेटेस्तोवर’. हे मूळ शोधणारी मानसयात्रा म्हणजे ’अनिमा अनिमस’. चिंतनाच्या मुळाशी पोचणं होवो किंवा न होवो पण ही कविता वाचकांच्या मनाच्या थेट मुळाशी जाऊन पोचते. कृपेश महाजनांच्या शब्दांची ही खूप मोठी ताकद आहे.

पुण्याच्या चपराक प्रकाशनाने अतिशय सुंदर असं हे पुस्तक बनवलंय. विष्णू थोरेंचं मुखपृष्ठ कवितांचा आशय नेमकेपणाने पकडणारं झालंय. शिवराम भोंडेकरांनी या कवितेची पाठराखण करताना काव्याच्या स्थूलाकडून सूक्ष्माकडे होणाऱ्या प्रवासाची दिशा सुस्पष्ट केली आहे. एकंदरीतच कृपेश महाजनांचा ‘अनिमा अनिमस’ हा कवितासंग्रह वाचनीय आणि संग्राह्य असाच झाला आहे.

पुस्तकाचे नाव – ’अनिमा अनिमस’ (काव्यसंग्रह)

कवी – कृपेश महाजन

प्रकाशक – घनश्याम पाटील, चपराक प्रकाशन, पुणे.

संपर्क – ७०५७२९२०९२

पृष्ठे – १०४

मूल्य – ११०

पुस्तक परिचय –

शिरीष पद्माकर देशमुख

मु. मंगरूळ पो. विडोळी ता. मंठा जि. जालना

मो. ७५८८७०३७१६

----------

# समीक्षा

## राजा दाहीर सिंग



लेखक अंकूश शिंगाडे यांची अनेक प्रकारची पुस्तके प्रकाशीत झालेली आहेत. त्यातील काही पुस्तकांची आवृत्ती आणि काही ऑनलाईन पुस्तके वाचकासमोर आलेली आहेत. त्यातील काही पुस्तके माझ्या वाचनात आलेली आहेत. बदला ही कादंबरी सिंध प्रदेशचा राजा दाहीर सिंग यांच्या जीवनावर लिहिलेली आहे.

श्री अंकुश शिंगाडे यांनी अफगाणिस्तानमध्ये असलेल्या त्या काळातील बौध्द धर्म आणि हिंदू धर्म एक विकसीत पावलेली संस्कृती होती. त्या काळातील समाजजीवन, बाजारपेठ, व्यापार, तसेच राजा दाहिर सिंग यांनी प्रत्येक धर्माचा केलेला सन्मान याचा लेखाजोगा त्यांनी आपल्या कादंबरीत मांडलेला आहे. त्यावेळचे राजकारण आणि समाजजीवन यांची माहिती त्यांनी आपल्या रोखठोक शब्दात लिहिली आहे.

बौध्द कालखंडाचे ते सोनेरी दिवस होते. त्यावेळचा असलेला हिंदूस्थान आणि सिंध ए दरीया म्हणजे सिंधू नदीच्या खोऱ्यातील जीवनशैली किती सुखी व संपन्न होती याविषयीची विस्तृत माहिती त्यांनी या कादंबरीत दिलेली आहे. सिंध म्हणजे हिंदूस्थानचे प्रवेश व्दार. आताच्या पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमध्ये असलेला सिंध प्रदेश म्हणजे सुखी संपन्न असलेली संस्कृती होय.

राजा दाहीर सिंग यांचे जीवन म्हणजे संपूर्ण भारत वर्षाला पडलेलं एक मखमली स्वप्न आहे. सहाव्या आणि सातव्या शतकातील घडामोडी त्यांनी अतिशय सहजपणे या पुस्तकाच्या रूपाने सर्वांसमोर ठेवलेल्या आहेत.

अंकुश शिंगाडे यांची एक लिखाणाची आगळी वेगळी शैली वाचायला मिळते. राजा दाहीर सिंग यांचे व्यक्तीमत्व, त्यांचे कौटूंबिक वातावरण याविषयी अंकुश शिंगाडे यांनी अभ्यासपूर्ण माहिती दिली आहे. या कादंबरीच्या निमित्ताने शब्दांचा मुक्तपणे स्वैर संचार होताना दिसून येते.

राजा दाहिर सिंग म्हणजे सिंध प्रदेशातील शेवटचा हिंदू राजा होय. येथूनच हिंदूस्थानमध्ये खऱ्या अर्थाने मुगलांच्या साम्राज्याला सुरूवात झाली. मोहम्मद बिन कासीम जेव्हा राजा दाहीर सिंग यांच्यावर चाल करून आला, तेव्हा त्यावेळचे वर्णन अतिशय रसाळ सादर केले आहे. लढाइ सुरू असतांना त्यांच्या महालातील पारीवारीक मतभेद आणि चिंता तसेच लढाईतील पडलेला रक्ताचा सडा, यामुळे कादंबरीतील रंजकता हळूहळू वाढत जाते.

राजा दाहीर सिंग यांच्या जीवनाचा घटनाक्रम, त्यांची जन्मतीथी, त्यांनी बहिनीसोबत केलेला विवाह, राजा दाहिर यांनी लढलेल्या लढाया याविषयी अनेक विद्वानामध्ये मतभेद आहेत. प्रत्येक मतभेद न्यायसंगत करून वेगवेगळे संदर्भ देत लेखकांनी आपल्या तार्किक बुद्धीचे दर्शन दिले आहे. त्यामुळे वाचकांनी ही कादंबरी वाचून आपल्या ज्ञानात भर घालावी असेच वाटतं.

सिंध प्रदेशाच्या इतिहासाशिवाय हिंदूस्थानचा इतिहास पुर्ण होवू शकत नाही. दाहिर सिंग यांची ऐकीव माहितीपर असलेला इतिहास प्रत्यक्ष लेखक अंकुश शिंगाडे हे आपल्या शब्दात मांडण्यात यशस्वी झाले आहेत. या कादंबरीतील सुटसुटीत आणि आटोपशीर वाक्ये वाचकांना एक प्रकारचा मोह घालतात. शब्दात रंगवीलेली गतकाळातील वैभवाची चित्रे पाहून उस्फुर्तपणे ओठावर येते.....कालाय तसमै नमः......आजच्या वाचकांना भूतकाळातील अनुभवाचा पुनर्प्रत्यय ही कादंबरी आणून देवू शकते असे मला खात्रीने नमूद करावेसे वाटते. या कादंबरीचा आनद वाचकांनी घेवून आपल्या ज्ञानात भर घालावी. अशी ही कादंबरी असून कादंबरीकार अंकूश शिंगाडे यांना पुढील लेखनासाठी खूप खूप शुभेच्छा.......

आपला नम्र

सुनिल वाडे,

साहित्य कला सेवा मंडळ जि. नागपूर

मो. नं. ८७८८३६५६७७

----------

**आपणांस हे मासिक कसे वाटले ? आपल्या सूचना आणि प्रतिक्रिया आम्हाला eprerna2021@gmail.com येथे मेल करून कळवाव्यात.**

# त्रिकोण




गॅलरीत बसून आकाशात उडणाऱ्या पाखरांना पाहत राहणे हाच आता विनायकरावांचा छंद बनला होता. सकाळचा चहापाणी झाला की ते गॅलरीत खुर्चीवर येऊन बसत.निवृत्तीनंतर तसे फारसे काही कामही नव्हते. करायचे ठरवले असते तर मिळालेही असते. पण त्यांच्या विक्षिप्त स्वभावामुळे त्यांना फारसे कुणी मित्रही नव्हते.

विश्वासराव सरकारी कार्यालयात मोठ्या पदावर कार्यरत होते. नोकरीच्या कालावधीत फक्त १० ते ६ ही कामाची वेळ त्यांनी तंतोतंत पाळली.विनाकारण कधी सुट्टया घेतल्या नाहीत. कधी बाहेरगावी बायकोला घेऊन फिरायला गेले नाही.फक्त एक दोनदा स्वत: कार्यालयीन सहलीला जाऊन आले होते. त्यामुळे निवृत्तीनंतर काय करायचे ? ह्याचा कधीच विचार केलेला नव्हता. तसे ते फार हुशार होते. लहानपणी गरिबीचे चटके सोसल्यामुळे चांगली नोकरी मिळवून पैसा कमवायचा हेच त्यांनी  जीवनाचे उद्दिष्ट ठरवले होते.

तेवढ्यात, 'जेवण तयार आहे. जेवायला चला.' अशी मंगलाबाईंची हाक त्यांच्या कानावर आली. दुपारी १२.३० वाजता जेवण टेबलवर आलेच पाहिजे.असा त्यांचा शिरस्ता होता.मंगलाबाई विश्वासरावांच्या पत्नी खूप देखण्या व हुशार होत्या.खरे तर लग्नानंतर त्यांना नोकरी करायची होती.परंतु विश्वास रावांनी त्याला नकार दिला.त्यामुळे मंगलाबाई आजतागायत गृहिणी म्हणूनच राहत होत्या.विश्वासरावांच्या स्वभावापुढे त्यांनी नमते घेतले होते.

नमते घेण्याच्या स्वभावामुळे त्या सतत विश्वासरावांच्या छायेतच राहिलेल्या.अनेकदा वाद व्हायचे पण शेवट त्यांच्या गप्प राहण्यानेच व्हायचा.विश्वासराव जेवण्यासाठी खुर्चीवर येऊन बसले.'तू पण घे जेवायला.आज आपण सोबतच जेवूया.'विश्वासराव म्हणाले.

'काय म्हणालात ?'असे आश्चर्याने मंगलाबाईंनी विचारल्यावर 'एकदा सांगून कळत नाही का ? बस जेवायला.'ते म्हणाले.लगेच मंगलाबाई त्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसल्या.परंतु त्यांना जेवण काही जाईना.लग्नात एकमेकांच्या शेजारी बसून जेवलेलो हेच त्यांच्या आठवणीत होते.आज ३५वर्षानंतर पुन्हा एकत्र बसून जेवणे त्यांना थोडे विचित्रच वाटत होते.

हो,विचित्रच...कारण याच्याआधी जेवण्यासाठी एकत्र तर सोडा पण विलासरावांचे जेवून होईपर्यंत त्या कधी खाली बसल्याच नव्हत्या आणि त्यांच्यासमोर कधी मोठ्याने हसल्याही नव्हत्या.नवऱ्यामधील हा बदल त्यांना अनपेक्षित होता.उशिरा का होईना बायकोचे मन हळूहळू उमजायला लागले.असे मनाशीच म्हणत त्या खूश झाल्या.

देवाने धनसंपदा अमाप दिली होती पण कूस मात्र रिकामीच राहिली.हे शल्य त्यांना सारखी टोचणी लावायचे.दुसऱ्या दिवसापासून विश्वासरावांमध्ये कमालीचा बदल दिसायला लागला.दोघे एकत्र बसून नाश्ता,जेवण करू लागले.संध्याकाळी फिरायला गेले की आवर्जून बायकोसाठी गजरा आणू लागले.ही गोष्ट मंगला बाईंना सुखावत होती.परंतु तरीही काही तरी अनामिक भीती त्यांच्या मनात निर्माण झाली होती.जास्त विचार न करता आहे तसेच चालू द्यावे असे त्यांनी ठरवले.खरे तर नटण्या बागडण्याच्या वयात त्यांना बंदिस्तासारखेच जगावे लागले होते.त्यामुळे हे सुख त्यांना तितके मोलाचे वाटते नव्हते.आधीच मूलबाळ नसल्याने मनाला रिक्तता आली होती.

'मंगल, लवकर तयार हो.आज आपण जेवायला बाहेर जाऊया.'

अहो आश्चर्यम् असे मनाशीच म्हणत मंगलाबाई छानशी गुलाबी रंगाची साडी नेसून दिवाणखान्यात आल्या.विनायकराव तर पाहतच राहिले.'ही आपलीच बायको आहे ना ?' असा त्यांना प्रश्न पडला. तशाच विचारात ते एका मोठ्या उपहारगृहामध्ये जेवायला गेले.हे दिवस मंगला बाईंना मंतरलेल्या दिवसांप्रमाणे भासू लागले.

विनायकराव मात्र त्या रात्री झोपू शकले नाही.तरूणपणी त्यांच्या हातून झालेली चूक आता त्यांच्यासमोर उभी राहिली होती.आठ दिवसांपूर्वी आलेल्या त्या फोनमुळे ते अस्वस्थ झाले होते.कार्यालयाच्या सहलीला गेल्यावर नशेत त्यांचा एका स्त्रीशी संबंध आला होता.आणि त्या संबंधातून जन्माला आलेल्या मुलीचा तो फोन होता.खरे तर ते पूर्णपणे जीवनातील ती रात्र विसरले होते.पण नियतीने तिचे काम चोख केले होते.त्या मुलीने त्यांना भेटायला बोलावले होते.जवळचे मित्र नसल्याने मंगलाबाईंनाच सोबत घेऊन जावे यासाठी ते त्यांना खूश ठेवण्याचा प्रयत्न करत होते.

शेवटी भेटायला जाण्याचा दिवस उजाडला.सकाळी लवकर उठून त्यांनी मंगला बाईंना पण फिरायला जायचे आहे असे सांगितले.जवळच असलेल्या सार्वजनिक उद्यानात ती मुलगी भेटायला येणार होती.बरोबर ११वाजता ते दोघे सांगितलेल्या ठिकाणी पोहोचले.ती बाकावर पाठमोरी बसलेली होती.कोणाची तरी चाहूल लागल्याने तिने मागे पाहिले.ती अगदी हुबेहूब विनायकरावांसारखीच दिसत होती.मंगलाबाईंना तर काहीच कळेना.त्या आळीपाळीने दोघांकडे पाहात होत्या.

'बाबा, मी कामिनी तुमची मुलगी.'

'तू कशावरून माझी मुलगी आहेस ? चेहऱ्यात साम्य असले म्हणून काय झाले ?'

'बरोबर आहे तुमचे. पण आईने मरण्यापूर्वी तुमची एक गोष्ट माझ्याकडे दिली होती. ' असे म्हणून तिने पर्समधून एक व्ही अक्षर असलेली सोन्याची अंगठी काढून दाखवली.त्यामुळे आता त्यांची खात्री पटली.

'माझी आई कॉल गर्ल होती.पण मी तिच्या पोटात असल्यापासून तिने सर्व सोडून दिले. मी पाच वर्षांची झाल्यावर अनाथाश्रमात ठेवले. मरेपर्यंत लोकांच्या घरी काम करत राहिली. मला तुमच्याविषयी कधीच सांगितले नाही. पण जेव्हा तिला वाटले की ,ती जास्त दिवस जगू शकणार नाही. तेव्हा तिने सर्व सांगितले.ती तुम्हाला कधीच दोष देत नव्हती.फक्त चांगल्या कुळाचे बीज वाया जाऊ नये. म्हणून तिने मला जगवले.

'आताही मी माझा हक्क मागायला आले नाही.फक्त आईबापाचे छत्र मला द्या. 'एवढे बोलून ती थोडी थांबली.

तिच्या बोलण्यातील सच्चेपणा जाणवून मंगलाबाईंचा सगळा रोष कमी झाला. त्यांनी लगेच पुढे होऊन कामिनीला जवळ घेतले. विनायकरावांनी हात जोडून त्यांची माफी मागितली.

'माफी नका मागू.तुमची एक चूक माझ्या उरलेल्या आयुष्यासाठी आनंदाचे चांदणे घेऊन आले आहे. मी तुम्हाला कधीच माफ केलय.'

कामिनीही लहान मुलीसारखी त्यांच्या कुशीत शिरले. आज खऱ्या अर्थाने त्यांच्या कुटुंबाचा त्रिकोण पूर्ण झाला होता.

सौ.गौरी एकनाथ शिरसाट

१६८/२६८३,ग्रुप नं.८/ ए,टागोर नगर,विक्रोळी ( पूर्व), मुंबई- ४०००८३.

संपर्क क्र. 9594078419

# कथा : 'न फिटणारे ऋण'



पाच वर्षाचा विजय हा आपल्या वडिलांच्या म्हणजे रामलाल च्या मागे मागे जाऊन आपल्या छोटया छोटया हातांनी काम करायचा . दिवसभर तो आपल्या वडिलांच्या सोबतच राहायचा . कारण त्याची आई लहानपणीच दगावली होती . त्याचे बाबाच त्याचे आई व बाबा या दोघांचेही काम सांभाळत होते . गावच्या पाटलाकडे रामलाल शेती वाडीचे काम करायचा . वार्षिक पगारी नौकर होता तो . रामलाल पाटलांकडे घरच्या सारखाच राहायचा . सकाळचा चहा नास्ता व दुपारचे जेवण पाटलांकडेच होत होते . मग सकाळ पासून दिवसभर शेतीचे व घरचे काम करायचा . विजय ची आई नसल्यामुळे त्याचा सर्वजण लाड करीत होते . विजय साठी सर्वांची सहानूभूती होती . हळू हळू तो मोठा होत होता . लोकांना वाटे तो मोठा होऊन आपल्या वडिलांचा काम सांभाळून पाटलाला चांगली मदत होईल . विजय पाटलाला खुप प्रश्न करायचा . पाटील सुध्दा त्याला आपल्या नातवंडासोबत खेळायला देत होते . पाळणा झुलवत होते . आपल्या सोबत फिरवत होते . विजय दिसायला सुदंर होता . आणि चलाख सुध्दा होता . तो हुशार आहे हे पाटलाच्या लक्षात आलं होतं . पाटलाचे नातू हे पाटलाला कधी काही प्रश्न विचारत नव्हते किंवा विजय सारखे चंचलही नव्हते . तेव्हा पाटलान विचार केला की या विजय ला आपल्या नातवांसोबत शाळेत शिकू दयायचं याच्या सोबत राहिल्याने माझे नातू सुध्दा हुशार होतील . अस विचार करुन पाटलांनी विजय ला शाळेत पहिल्या वर्गात टाकलं तेव्हा त्याचे वय पूर्ण सहा वर्षाचे होते . विजय पाटलांच्या नातवासोबत शाळेत जाऊ लगला . वर्गात सुध्दा तो शिक्षकांना खुप प्रश्न विचारत होता . आपल्या मनातील प्रश्नांचे उत्तर तो आपल्या शिक्षकांकडून मिळवून घेत होता . त्याच्या हुशारकीने शिक्षक ही खुश होते . तो आपल्या वर्गात पहिला येत होता . असं करता करता तो मुलगा पहिली पासून सातवी पर्यंत गावात शिकला . सोबत पाटलाचा नातू सुध्दा होता . पण तो अभ्यासात तेवढा हुशार नसल्यामुळे त्याला कधी विजय सारखे गुण मिळत नव्हते . जस जसे हे दोन्ही मुलं मोठे होऊ लागले तस तसा पाटलाच्या नातवांमध्ये विजय बद्दल घृणा आणि ईर्ष्या निर्माण होऊ लागली . काही त्याचे दुसरे मित्र म्हणायचे की विजय हा तुझ्या नौकराचा मुलगा आहे त्याला तुझे आजोबा का शिकवितात ? त्याच्यामुळे तू मागे पडतो आहे . कोणी कोणामुळे मागे पडत नाही हे त्याला त्यावेळी समजत नसावे . सातवी नंतरच्या पुढच्या शिक्षणासाठी पाटील आपल्या नातवाला घेऊन तालुक्याला गेले व त्याचे एडमिशन करुन आले . तेव्हा विजय आपल्या वडिलांना म्हणाला , " बाबा मला पण शिकायचं आहे . माझा तर पहिला नंबर आला आहे . मला तुम्ही शाळेत एडमिशन करुन दया ' . तेव्हा विजय चे बाबा म्हणाले , " नाही रे बाळा , तुला आता पुढं मी कसा शिकवू ? त्याच्या साठी तालुक्याला जावं लागेल . तु कसा जाशिल ? ' विजय म्हणाला ते मला माहित नाही पण मला शिकायचं आहे .

विजय च्या वडिलांजवळ सायकल नव्हती . तालुक्याच्या ठिकाणाचं अतर पंधरा किमी होतं . रामलाल विचारच करीत राहीला की मी तर एकही वर्ग शिकू शकलो नाही म्हणून तर या पाटलाच्या घरी काम करतो . माझं सर्व काही पाटीलच आहेत . माझ्याकडे पैसा नाही पण मी उपाशीही राहत नाही . कधी प्रकृती खराब झाली तर पाटलांचा डॉक्टरच मला औषध देतो . मला व माझ्या मुलांचा सर्व प्रकारे सांभाळ ही पाटीलच करतात,कारण माझ्याकडे शेती नाही किंवा पैसा कमविण्याचे दुसरे साधन ही नाही . चला एकदा पाटलांना म्हणून पाहू या . रामलालन पाटलांना विजय ची शिकण्याची ईच्छा सांगितली तेव्हा पाटील रामलाल ला म्हणाले , " पहा रामलाल गावच्या शाळेत मी तुझ्या मुलाला सातवी पर्यंत शिकवलं , आता पुरे झाले . काय करेल तो शिकून . तुझ्या नंतर तुझे काम त्यालाच सांभाळायचे आहे; म्हणून तू आपले काम त्याला हळूहळू शिकव " . असे ऐकल्यावर रामलाल दुःखी झाला . मी माझ्या मुलाला पुढे शिकवू शकत नाही . हे त्याला

कळलं होतं . विजय सतत आपल्या बाबाला म्हणायचा मला शिकायचं आहे . दोन महिन्यानंतर पाटलांचा मोठा मुलगा मुंबईवरुन आला . तो मुंबईला मोठया पदावर काम करीत होता . त्याचा पूर्ण परिवार सुटी घेऊन गावात पंधरा दिवसासाठी आला होता . त्याच्या सेवेसाठी विजय ला पाटलांनी आज्ञा केली होती . तेव्हा विजय हा त्यांची व त्यांच्या मुलांची सेवा करु लागला . त्यांना काहीही अडचण गेली की विजय त्यांचे सर्व कामं करु लागला . रामलाल चा मुलगा म्हणून सर्व त्याला घरचाच गडी आहे असे समजू लागले . पंधरा दिवस झाले पाटलाचे चिरंजीव मुंबईला परत जायला निघाले . विजय च्या सेवेपासून ते खुप खुश होते . त्यांच्या लक्षात आलं होतं की विजय खुप हुशार मुलगा आहे . सांगितलेले प्रत्येक काम तो नम्रपणे ऐकतो व करतो . जाता जाता विजय ला विचारले की तु आमच्या सोबत मुंबईला येशील का ? तेव्हा तो आपल्या बाबांकडे पाहत राहिला . त्याच्या बाबानं होकार दिल्यावर तो म्हणाला की मला शाळा शिकवाल तर मी येतो . तेव्हा ते म्हणाले की चल एवढं ना ? तू शाळेत माझ्या मुलांसोबत जाशिल व नंतर घरचे कामही करशील . तेव्हा विजय खुप खुश झाला . पाटलांनी सुध्दा परवानगी दिली . अशा प्रकारे विजय मुंबईला आला . साहेबांच्या मुलासोबत त्याचेही एडमिशन त्यांनी करुन दिले होते . तो शाळेत जाऊन घरचे सर्व कामे करायचा . साहेब व त्यांच्या घरचे सर्व लोक विजय पासून खुश होते . रात्री विजय साहेबांच्या लहान मुलीला शिकवित सुध्दा होता . हे पाहून साहेब म्हणाले की तुला जेवढं शिकायचं आहे तेवढं मी तुला शिकविणार . तू मन लावून काम कर व शिक . विजय फार समाधानी होता . तो दहावीत चांगले गुण घेऊन पास झाला होता . त्याच्या शाळेत सर्व शिक्षक त्याचे कौतूक करीत होते . त्याच्या वर्गशिक्षकाला त्याच्या घरची स्थिती माहित होती म्हणून त्यांनी विजय ला एक सल्ला दिला तू पुढे पॉलीटेक्नीक ला एडमिशन करुन तीन वर्षाचा इंजिनीअरींग चा डिप्लोमा करुन टाक . त्यांन आपल्या शिक्षकाचे म्हणणे आपल्या साहेबांना सांगितले व त्यांनी त्याचा एडमिशन करुन दिला . तो तीन वर्षात न अडखळता चांगल्या गुणांनी पास झाला . त्याला कॉलेज कडूनच एका कंपनीत नोकरी सुध्दा मिळाली . तो नोकरी करुनही घरचे काम सांभाळीत होता . त्याला पुन्हा पुढे शिकायची इच्छा झाली व तो एका वर्षानंतर बी.ई. मध्ये आपले एडमिशन करुन त्यांने पुढच्या तीन वर्षात आपली डिग्री पूर्ण केली . आता तो मोठा झाला होता . साहेबांच्या मुलापेक्षाही हा मुलगा जास्त हुशार होता . पण त्याचे आधार साहेब असल्यामुळे तो त्यांना आपले आई बापच मानत होता . त्याला आता सरकारी नोकरी लागली होती . एरीगेशन विभागात तो इंजिनिअर झाला होता . त्याच्या लग्नाची वेळ आली होती . साहेबाची लहान मुलगी त्याला मनातल्या मनात पसंत होती पण तो कधीच काही बोलून दाखविले नव्हते की त्या मुलीनेही कधी त्याला काही बोलले नव्हते . त्या मुलीच्या आईला मात्र हे सगळे कळत होते . तीने साहेबांना सांगितलं की विजय चांगला मुलगा आहे . आपण आपल्या लहान सोनुचं लग्न त्याच्याशी लावून टाकू . साहेबही शहरात राहून मोठया मनाचे झालेच होते . त्यांना ती गोष्ट पटली व त्यांनी विजय ला आपले विचार सांगितले . तो तर काही बोलुच शकला नाही . कारण त्याला माहित होतं की आज आपण जे काही आहोत ते सर्व साहेबांमुळे व त्यांचे वडिल पाटील यांच्यामुळे . तो आपल्या आयुष्याचा एवढा मोठा निर्णय कसं घेणार ? त्याच्या संपूर्ण कुटुंबात तो पहिला पदवीधारक होता . आणि सरकारी इंजिनिअर सुध्दा . त्याचे लग्न झाले . तो खुप सुखी व समाधानी झाला . त्याचे नंतरचे आयुष्य फार बदलून गेले . पाच वर्षातच त्याच्या कामानुसार त्याला दोन पदोन्नती मिळाल्या . तो आपल्या विभागाचा उपविभागीय अधिकारी झाला होता . जीवनाच्या या प्रवासात त्याच्यावर खुप लोकांचे उपकार होते . तो एकही व्यक्तीला विसरला नव्हता . किती तरी लोक त्याच्या जीवनात आले होते . त्याचे वडिल , आईची आठवण , पाटील , प्राथमिक शाळेचे गुरुजी , दहावीचे सर , मुंबईचे साहेब ईत्यादी या सर्वाचे ऋणातून तो कधिच मुक्त झाला नव्हता व तो कधी मुक्त होणार ही नव्हता . त्या सर्वाबद्दल विजय कृतज्ञ होता .

महेन्द्र सोनेवाने , गोंदिया

मो . ९ ४२१८०२०६७

# हट्टी आजोबा



सदोदित आनंदी आणि उत्साही असलेले दांपत्य म्हणजे नेने आजोबा आणि आजी. संपूर्ण हयातभर नोकरी राहुरी येथे केली रिटायर्ड येथेच झाले रिटायर्ड झाल्यानंतर आजी आजोबांची मुलं पुण्याला सेटल झाली परंतु आजी-आजोबांना काही पुण्यात करमत नाही त्यामुळे ते अधून मधून राहुरीला फेरफटका मारतात. मागील वर्षी फेब्रुवारीमध्ये ते राहुरी ला राहण्यासाठी आले आणि मार्च महिन्यात कोरोनामुळे लॉक डाऊन झाले त्यामुळे त्यांना काही पुण्याला जाता आले नाही. नेने आजीचा सगळा वेळ दिवसभर घरातील कामे करण्यात जात असे. तर सकाळी नेने आजोबा बाबा रामदेवांची योगासने ,प्राणायाम करत. रामरक्षा म्हणत, आजीला थोडीफार स्वयंपाकात मदत करत, दुपारी एक छानशी झोप काढत. संध्याकाळी गॅलरीत उभा राहून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांकडे बघत वेळ जात असे. थोडेफार मुलाला फोन, मुलीला फोन, नातेवाईकांना फोन असं चालू होतं. वर्षाची सुरुवात पाडवा सणाने होते परंतु पाडव्याला लॉक डाऊन असल्याने गुढीला बांधण्यासाठी गाठी आणता आली नाही व गाठीविनाच वर्षाचे स्वागत झाले. गौरी गणपती आले परंतु गौरी गणपतीचा उत्साह काही नव्हता. नेने आजी-आजोबांना आता कुठेतरी बाहेर पडावं आपल्या माणसांना भेटावं असं वाटत होतं. नेने आजींची बहिण जवळच राहत असल्यामुळे त्यांनी दोघांनाही गौरी गणपतीसाठी आमंत्रण दिले. नेने आजींचा भाचा चार चाकी घेऊन आला व आजींना गौरी गणपतीसाठी घेऊन गेला. आजी व आजोबा गौरी गणपती साठी त्यांच्या घरी गेले खरे पण येताना मात्र हे कोरोना घेऊन आले. आजीच्या बहिणीच्या जावयांना कोरोना झाला होता ते देखील गौरी गणपतीसाठी राहुरीला आले सर्व जण एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे सर्वांनाच कोरोनाची लागण झाली होती. नेने आजी-आजोबा दोघांनाही कोरूना ची लागण झाली. दवाखान्यात पंधरा दिवस ऍडमिट झाले. मुलगा, मुलगी, सून, जावई असून कोणीही त्यांच्या सेवेसाठी येऊ शकत नव्हते कारण त्यांना कोरोना झालेला होता. नेने आजोबांना डायबिटीस होता त्यामुळे आजी-आजोबा फारसे कुठे फिरायला जात नसत कारण त्यांना दगदग मानवत नसे राहुरी आणि पुणे सोडून दुसरीकडे नेणे आजोबा आजी जात नसत. रिटायर झाल्यानंतर अनेक जण त्यांना म्हणाली चारधाम करा फिरून या परंतु आजोबांच्या तब्येतीमुळे आजीने कधीही चार धाम किंवा इतर कुठे फिरायला जाण्याचा हट्ट केला नाही. कपडालत्ता किंवा इतर काही खर्च आजी आजोबा करत नव्हते परंतु कोरोना या आजाराने मात्र दोन लाख रुपये त्यांच्याकडून वसूल केले होते . सर्वांनी त्यांना निक्षून सांगितले होते लस आल्याशिवाय घराबाहेर पडायचे नाही आजी आजोबा घरात अडकुन पडले. दिवाळीला मुलगा मुलगी सर्वजण एक एक करून भेटून गेले परंतु पुण्याला काही आजी-आजोबांना येण्यासाठी कोणीही हिरवा सिग्नल देत नव्हते. नातवंडांना रोज व्हिडिओ कॉल करून मन भरत नव्हते. प्रत्यक्ष भेटण्याची आस आजी-आजोबांना लागलेली होती. टीव्हीवरच्या रेडिओवरच्या बातम्या, व्हाट्सअप वर च्या बातम्या बघून लस आपल्यापर्यंत कधी येईल याची वाट दोघेही पाहत, आला दिवस आनंदाने साजरा करत होते. कोरोनाने शरीरावर दुष्परिणाम केले होते ते हळूहळू दिसत होते .आजींना थोडेफार पाय दुखणे, पाठ दुखणे असा त्रास होई. बाबा प्राणायाम नियमित करत. भाजी, किराणा आणायला जाणे थोडे-फार मंदिरात जाणे या कामासाठी त्यांचे बाहेर पडणे होत असे तोंडाला मास्क लावूनच तिकडे वावरत असत .

कोरोना मधून बरे होऊन आता सहा महिने उलटले होते पण बाबांनी एवढ्यात काही शुगर चेक केली नव्हती. आजी सारखे मागे लागल्या अहो शुगर चेक करून घ्या. एवढ्यात फार गोड खान होते. मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे सगळ्यांनी सांगून झालं आजोबा काही शुगर चेक करायला जायला तयार होईना. बाबा म्हणाले अरे कोरोनाच्या काळात किती सुया टोचल्या माझ्या शरीराला किती वेदना झाल्या मला आता माझ्यात

ताकत नाही. पुन्हा वेदना सहन करण्याची माझी अजिबात इच्छा नाही. मी शुगर चेक करायला जाणार नाही आता काहीही होवो.

आजोबांना कसे समजावून सांगावे हेच कळेनासे झाले होते सर्वांना. लहान मूल असतं तर हाताला धरून नेले असते दवाखान्यात. एवढ्या मोठ्या माणसाला समजून कसं सांगायचं मोठा प्रश्न पडला सर्वांना. आजी आजोबा एकटीच राहत होती राहुरीत, आजोबांना अचानक काही झाले तर किती धावपळ होणार होती आजींची. एकदा कोरोना झाला आहे पुन्हा होणार नाही कशावरून आणि पुन्हा तसा प्रसंग आला तर कसे होणार याची चिंता आजींना सतावत होती. आता शुगर चेक करण्यासाठी तयार कसे करायचे ?

नेणे आजी-आजोबांच्या शेजारी एक कुटुंब राहत होते सुर्वे नावाचे त्यांना एक मुलगा आणि मुलगी होती. मुलगी इयत्ता दहावी तर मुलगा पाचवीत. नेने आजी-आजोबांची नातवंडे पुण्याला होते परंतु सुर्वेंच्या मुलांमध्ये त्यांना त्यांची नातवंडे दिसायची त्यामुळे सुर्वे कुटुंबाची व नेणे आजी-आजोबांची चांगली गट्टी जमली होती . नेणे आजी-आजोबांना कोरोनो झाला तेव्हा सुर्वेंची मुलं किचन मधल्या खिडकीतून त्यांच्याशी बोलायची तेवढेच आजी-आजोबांना बरे वाटायचे. फोनवर बोलून एकमेकांशी गप्पा मारायची. कोरोनामुळे लॉक डाऊन काळात सर्वजण घरात बंदिस्त होते परंतु भावना मात्र बंदिस्त नव्हत्या. नाती रक्ताची असोत वा मानलेली माणसं मनाने एकमेकांशी जोडलेले होती त्याचंच उदाहरण म्हणजे सुर्वे व नेने कुटुंब होते.

मनस्वी ही सुर्वे यांची मुलगी नेने आजी-आजोबांशी तिची चांगली गट्टी होती. आजोबा शुगर चेक करायला जात नाही ही गोष्ट सर्वांना समजली होती. मनस्वीला ही गोष्ट समजले होते तिने ही आजोबांना सांगण्याचा प्रयत्न केला आजोबा तिला म्हणाले अगं मला सुया टोचतील शुगर चेक करण्यासाठी. तुला आवडेल का माझ्या वेदना बघायला ? आजोबा असे म्हटल्यावर त्यांना काय उत्तर द्यावे मनस्वीला हा प्रश्न पडला. मनस्वी ची आई म्हणाली अहो आजोबा तुम्हाला काही कमी जास्त झाले तरआजी एकट्या आहेत त्यांची किती धावपळ होईल. त्यांचा काहीतरी विचार करा. एवढे सांगितले तरीही आजोबा तयार झाले नाहीत.

मनस्वी दहावीला होती तिची शाळा चालू झाली होती ती एक दिवसाआड शाळेत जात असे परंतु तिची आई तिला गाडीवरून सोडवत असे त्यामुळे मनस्वी ची सायकल तशीच पडून होती.

लॉकडॉऊन मुळे सायकल बरेच दिवस झाले होते एकाच जागी होती .आजोबांना सायकल चा व्यायाम खूप आवडत असे पण त्यांची सायकल पुण्याला होती ते म्हणाले मनस्वी मी तुझ्या सायकलवरून संध्याकाळी रोज एक फेरफटका मारीत जाईन. मनस्वी म्हणाली चालेल आजोबा नक्कीच पण लॉकडाउनमूळे सायकल काही वापरत नाही तिची ब्रेक पण काम करत नाहीत आणि जागची हलत नाही तिला दुरुस्त करून आणावे लागेल मग तुम्ही वापरा आजोबा खुशाल ती सायकल. आजोबा खुश झाले. खूप दिवसांनी मोकळ्या हवेत सायकल चालवायला मिळणार म्हणून खूप आनंदी झाले. लॉक डॉऊन नंतर सायकल वरून फिरून हवेशी बोलणार होते. मनस्वीला ही संधी मिळाली होती तिने संधीचे सोने करायचे ठरवले मनस्वी आजोबांना म्हणाला आजोबा मी माझी सायकल तुम्हाला चालवायला देईल पण एका अटीवर तुम्ही जर शुगर चेक करून आलात तरच माझी सायकल मिळेल नाहीतर मी माझी सायकल तुम्हाला देणार नाही. आजोबा म्हणाले हे काही बरोबर नाही मनस्वी म्हणाली मग तुम्ही जे वागतात ते बरोबर आहे का ? तुमचा जर हट्ट असेल शुगर मी चेक करणार नाही तर माझाही हट्ट आहे मी तुम्हाला शुगर चेक केल्या शिवाय सायकल देणार नाही. बघा काय करायचे ते. मनस्वी ची युक्ती कामी आली सायकलवर जाण्यासाठी आजोबा शुगर चेक करण्यासाठी तयार झाले आणि प्रश्न सुटला .धाक दाखवून दमदाटी करून ते काम होणार नव्हते ते काम प्रेमाने सहज शक्य झाले आजोबांच्या हट्टापुढे जिथे सर्वांनी हात टेकले होते तिथे आजोबा समोर एक प्रेमळ हट्ट करून हट्टी आजोबांचा हट्ट मोडीत निघाला होता.

सविता साळुंके (उचीत) श्रीरामपूर

9604231747

# पौष्टिक लाडू



साहित्य- दोन वाट्या जवस, एक वाटी तीळ, एक वाटी खरबूजाच्या बिया,अर्धी वाटी बदाम, पावणे दोन वाट्या गूळ, पाव वाटी पाणी, दोन चमचे साजूक तूप

कृती- जवस, तीळ, खरबूजाच्या बिया, बदाम सर्व एकत्र खमंग भाजून घ्यावे आणि मिक्सरच्या भांड्यांत बारीक करून घ्यावे. अगदी बारीक करू नये. थोडं आरडबोबड असावे. दोन चमचे तूप कढईत घालून त्यात गूळ वितळवून घ्यावा आणि पाणी घालावे. गुळाचा पाक झाला की गॅस बंद करून त्यात बारीक केलेले मिश्रण घालावे. छान हालवून लाडू वळायला घ्यावेत. हे लाडू आठ ते दहा दिवस टिकतात.

फायदे- कॅलशिअम,ओमेगा थ्री फॅटी ऍसिड, लोह, व्हिटॅमिन इ, फाईबर इत्यादी घटक मिळतात. शिवाय सांधेदुखी व वजन कमी करण्यासाठी पण फायदेशीर ठरतात.


सौ.प्रिती दबडे,पुणे

९३२६८२२९९८


----------------

## काव्य विभाग :

### गुढी पाडवा

दान धर्म खरेदीचा
शुभ पवित्र गोडवा
चैत्र शुद्ध प्रतिपदा
सण तो गुढी पाडवा
प्रथा लौकिक प्रतीक
सृष्टी निर्मिली ब्रम्हाने
चौदा वर्षे वनवासी
राम विजयी तोरणे
पुत्र कुंभाराचा ज्ञानी
दिव्य तो शालिवाहन
केले पराभूत शकां

प्राण मातीत निर्मून
काल गणना आरंभ
नाव ते शालिवाहन
गुढी पाडव्या पासून
सुरू हिंदू धर्मी सन
साडी चोळीनी सजून
लक्ष्मी उभी अंगणात
पूर्ण अपूर्ण स्वप्नांचा
कल्प वृक्ष हा मनात
शिरी तांब्याचा कलश
झेंडू बताशांचा हार

बांबू मानवाची काया
शुद्ध शास्त्राचा आधार
म्हणे कोंकणी सौसार
प्रांत कन्नडी युगादी
भाषी तेलगू उगाडी
गुढी पाडवा उपाधी
आम्र चिंच गुळवणी
घेऊ स्वादिष्ट प्रसाद
पूजा अंतरी गुढीची
लाभे सर्वां आशीर्वाद

पांडुरंग शंकरराव आडबलवाड, (सहशिक्षक)
हु. पानसरे हायस्कूल, धर्माबाद.जि.नांदेड
मो. नं. ९१५८५५१९७५

------------------

### एकांत आणि आठवणी

एकांतात आठवला मज
गतकाळ जीवनातला
दैना कष्टकर्यांची होती
पण होता मोठ्या मनातला
नव्हती घरात रेलचेल
अन्न वस्त्र निवार्याची
पण उपाशी कोणी नसे

सोय असे अंगणातील पक्षांची
कपड्याचे मोल बहू असायचे
असायची दोन वस्त्र कशीतरी
पण इज्जत झाकलेली असायची
आजची फॅशन मन हैरान करी
असायची रोज चटणी भाकरी
पण तिची चव न्यारीच बरं

आज खातोय पाचिपक्वानं
जिभेचे चोचले पुरवतोय खरं
छडी वाजायची छमछम
विद्या यायची घमघम
आजच्या शिक्षणात सांगा
कुठेच दिसत नाही दम

घर अंगण पोरा बाळांनी
भरलेल गोकूळ दिसायचं
पै पाहुने येनारे जानारे
घर गजबजुन जायचं

आता मात्र हम दो हमारे दो
इतकच विश्व मानसाचं
आईवडिलांनाही स्थान नाही
कस पुढील पिढ्यांच व्हायचं

म्हणुन सर्वांना सांगणे आहे
मानुसकी जपावी सर्वांनी
कोणाचच भल होत नाही
प्रवाहा विरुध्द वागण्यांनी
प्रवाहा विरुध्द वागण्यांनी...

सौ.खेडकर सुभद्रा
मुख्याध्यापिका जि.प.
प्रा.शा.पिठ्ठी ता.पाटोदा
जि.बीड मो.9403593764

----------------

## वसंत फुलला मनोमनी

सडा प्राजक्ताचा दारी पडला
मनोमनी असा वसंत फुलला
जाई जुई चमेली गंधाळल्या
पळसाचा बहर दारी खुलला

वसंतात पानगळ दिसे रानात
धुंद करतो मोहर आम्रवृक्षाचा
फांद्याफांद्यात कोवळी पालवी
ऐकू सुरेल रव कोकिळपक्षाचा

टांगला झोका वडाच्या फांदी
हिंदोळता सयीसंगे या अंगणी
माहेरच्या वाटेवरी होती गोळा
बालपणीच्या येती आठवणी

चैत्र सोहळा गुढीपाडव्याचा
बंधुराजा न्याया येतो सासरी

भेटता मायबापा भाऊवहिनी
सांडते सुख जाताना माहेरी

लेकीबाळा मुली येता माहेरी
भेटती प्रेमानेच सणावाराला
झिम्माफुगडी घालती अंगणी
तव वसंत मनोमनी गं फुलला

उन्हाळ्याचे दिस येताच करा
लोणचे सांडगे पापड शेवया
दारी घातलेले वाळवण सारे
कोठारात भरु धान्य कुरडया

आला वसंत हा वाजतगाजत
भेगाळली भुई सारे शेत रान
तहानले पशुपक्षी मुकेच जीव
कशी भागवावी त्यांची तहान

सौ. भारती सावंत, मुंबई
9653445835

# काळोख

दाट काळोख मनात
ढग जमले क्षणात
आला पाऊस भरून
मन पाखरू रानात
वाट पाहे वसुंधरा
रूणझूण वाजे धून
पक्षी करी किलबिल

आर्त स्वरांत रूतून
हाती तिफन घेऊन
आला पाऊस पाहून
कुणब्याची घुसमट
झूरे मनात राहून
झाली  जमीन कोरडी
दिसे कोरडा दुष्काळ

काही पडेना पाऊस
कधी बदलेल काळ
कसं चित्र भयंकर
रागावला दिनकर
काळ्या काळ्या जलदात
कोंडीयले मोतीसर

कविता नरवडे
मस्तगड जूना जालना 431203
Mo.7620434279

---

# सुखाचे सोबती

होतो जेंव्हा हिरवागार
सर्वजण गुण गायचे,
जाता येता मजकडे
पाहतचं  ते राहायचे.
झिजवली ती तुमच्यासाठी
माझी ती काया,
नाना संकटे सोसून
दिली तुम्हा छाया.

सुखाचे सर्व सोबती
आले मला कळून,
ज्यांना आपले समजलो
ते पण गेले पळून.
ऊन ,पाऊस वादळवारा
नाही केली पर्वा,
परोपकारी वृत्ती माझी
उभा मिळण्या सुख सर्वा.

किती नाचले हसले
माझ्या या अंगावरती,
सायंकाळ होत असता
हजारोंची व्हायची भरती.
फळे असता माझ्यावरती
यायचे चिमणी कावळे,
उपयोग घेऊन माझा
उडून गेले सगळे.

आनंद यडपलवार
जारीकोट,ता.धर्माबाद
9975996856

## 'नको जावू दूर'

तहानलेला जीव चिमणी
हल्ली ती दिसत नाही
रागावली का गं चिऊ
सांग बरं मला काही ? //१//

तहानलेला जीव कुत्रा
जीभ त्याची हलवतो
गुलमोहराच्या छायेखाली
तृषार्त जीव विसावतो //२//

महाडच्या चवदार तळ्यासाठी
बाबासाहेबांनी छेडले आंदोलन
खुले झाले गोड पाणी
मंजूर झाले आर्जव आवेदन //३//

जप मानवा, तू निसर्गा
राख पर्यावरण संतुलन
मिळेल सर्वांनाच पाणी
थांबव आता सर्वच प्रदूषण //४//

गंधार स्वरांच्या नादासम
जागृत केला दलित समाज
नभी तेजाळली निळी सूर्य किरणे
नमिते मी त्यांना सस्मित सरोज //५//

सौ. सरोज सुरेश गाजरे
भाईंदर

-------------------

## आठवण शाळेची

घंटेची घणघण नाही कानावर
मुलांचा आवाज कधी येणार।
परी मुलांचा भास सतत मनी
माझी शाळा कधी सुरू होणार ।।

खिचडीचा सुंगधी दरवळ नाही
तरी मसालेभात आर्त साद घाली
ताटांचा आवाज पडे माझे कानी
मज आठवण शाळेची आली ।।

अभ्यास दाखवायची घाई नाही
मुलांचा घोळका मनात असतो ।
आता काय करु मुलांचे प्रश्न येती
आठवणींचा चटका मनाला बसतो ।

कधी होणार आपली शाळा सुरू
शाळेतील फुले मुले कोमेजली ।
शाळा मुलांच्या गोंगाटाविणा
कडा डोळ्याची आता ओलावली ।।

मुलांशिवाय शाळा सुनी वाटते
हेलावते मन सुन्न होऊन।
कोरडा खळू फळा पाहे वाट
खिन्न ओसाड शाळा पाहून ।।

येणार कधी आवडते सवंगडी
वर्गामधील डेस्क सुद्धा बोलती ।
शुकशुकाट झाला अगदी शाळेत
वरचेवर प्रश्न मलाच विचारती ।।

सौ.यशोधरा सोनेवाने, गोंदिया

## पालापाचोळा

अशोक वृक्षांची माळ अंगणात
ताठ उभी ती झुलती तोऱ्यात
शिशिर येता थंडी घाली गळ
आणि मग सुरु होई पानगळ
रागावून तो टाकी पाने पायाशी
पालापाचोळा होई खट्टू मनाशी
नविन आशा घेऊनि येई उषा
उजळून टाकी साऱ्या दाही दिशा
उल्हासाने येई चंद्र रातच्याला

उदासपणे बघे वेडा पाचोळा
सळसळ हसती पाने तयाला
स्फुरण चढे ओल्या गवताला
तुडवून जाती जन सारे त्याला
कुरकुरत बसे रस्त्यात एकला
गरीब बिचारा तो पालापाचोळा
रागावून म्हणे वरच्या पानाला
गर्व इतुका तुज हवा कशाला
उद्या होशील तू एक माझ्यातला

शुभदा दीक्षित पुणे
9881062115

---------------------

## कोरोना

कुणी बाहेर जाणार नाही
कुणी आत येणार नाही
करायचे आहे रक्षण मला!
घराचा उंबरठा म्हणाला....
आज अंतर राखून आहो
नसू सहवासात,सोबत आहो
नंतर भेटायचे एकमेकाला
घराचा उंबरठा म्हणाला...

घरी रहा, सुरक्षित रहा
आपल्याला जपत रहा
बाहेरचा धोका हवा कशाला
घराचा उंबरठा म्हणाला....
करोडोंची महाशक्ती आहे.
उद्याचा आशेचा किरण आहे
महायुद्धाशी सामना करायला
घरात रहा उंबरठा म्हणाला....

मीना खोंड, हैद्राबाद

## कोरोना-एक राक्षस

बघता बघता वर्ष सरलं
वाढदिवस कोरोनाचा झाला
कधी जाईल आपल्यातून
साऱ्यांना ध्यास लागला

विसरू नका घालायला मास्क
पाळा सामाजिक अंतर
साबणाने हात धुवा स्वच्छ
नको व्हायला पश्चाताप नंतर

केला त्याने सर्वांचा छळ फार
आहे तो मोठा अमानुष राक्षस
त्यासाठी आला जालीम उपाय
रामराम ठोकूया त्याला घेऊनी लस

येता तुमच्यापर्यंत लस
पाळायचे काही नियम तरी
नाही हयगय कुठलीही
वाटत असले बरे जरी

सौ.प्रिती दबडे, पुणे
९३२६८२२९९८

-----------------

## चांदणरात

मुग्ध चांदण्या रात्रीस
घ्यावे गोंदून चांदण,
सख्या साजणाचे मन
मला मिळाले आंदण...

हात हातात घेऊन
करू सफर नभाची,
तुझा मखमली स्पर्श
देतो ऊब चांदण्याची...

बहरली रातराणी
लयलूट सुवासाची,
ओढ लागली मनाला
सख्या तुला भेटण्याची...

रात्रभर चांदण्यांची
चमचम आकाशात,
होते त्यांची पखरण
तुझ्या रे बाहुपाशात...

सौ.गौरी ए.शिरसाट, मुंबई

--------------------

# 'एका दिलाने राहू या'

देश बलशाली आपण बनवू या
आपण सारे भारतीय एकदिलाने राहू या
कोणी न इथे उच निच मानू या
जाती धर्माच्या भिंती तोडू या
हुंडा बंदी दारूबंदी करू या
गुण्या गोविंदाने नांदू या...१

भ्रष्टाचारी यास पकडुन देवू या
घाम गाळून समाधानाची भाकरी खाऊ या
देशात शांतता नांदवू या
देशाचा झेंडा उंच ठेवू या...२

देश द्रोह्याना ठेचून काढू या
देशाचे ऐक्य टिकवू या
स्वाभिमानी जीवन जगू या
देश भक्तांना वंदन करू या...३

अंधश्रधेला गढून टाकू या
अन्यायकारक रुधीला सोडू या
हातात हात देवू या
गरीबाला मदत करू या....४

चांगले शिक्षण घेऊ या
कॉफी करनाराला पकडुन देवू या
गुरूंना वंदन करू या
देशाचे आधारस्तंभ बनू या...५

घाणेरडी फॅशन सोडू या
फॅशन मुळे होणारी देहप्रदर्षणे थांबवू या
देशाची म्हण संस्कृती जतन करू या
पाशच्यात संस्कृती फेकून देवू या...६

आईवडिलांची सेवा करू या
थोरामोठ्यांचे अनुकरण करू या
देश प्रेमाची गीते गावू या
दिस्कोडॉन्सची गीते सोडू या...७

महात्मा फुले,आंबेडकरांचे
स्मरण करू या
दलितांची दुःखे समजून घेऊ या
गरिबांना स्वावलंबी करू या
प्रत्येकास सन्मानाने वागवू या...८

तंबाखू,दारू, गर्द गुटखा सोडू या
कर्क,एड्स, कोरोना रोगापासून वाचवू या
परस्त्री मातेसमान मानू या
शिवरायांचा संदेश आचरणात आणू या...९

जी.एस.कुचेकर पाटील,
सेवा निवृत मंडळ अधिकारी,
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न.७५८८५६०७६१.

# ‘ज्योतींचा बा’

तूच लाविली पणती साक्षरतेची घराघरांतून,

उजळिलेस ज्ञानप्रकाशाने गेला अंधार संपून....

शिकवून अर्धांगिनीस बीज समानतेचं रूजवलं,

लढून स्त्रीयांसाठी बळ पंखात तयांच्या भरलं....

जाणून दुःख बळीराजाचं लेखणीतून मांडलं,

दुर्बल,वंचितांच्या हक्कासाठी रक्ताचं पाणी केलं....

मोफत,सक्तीच्या शिक्षणाचं महत्त्वही तूच जाणलं,

अविद्येचा परिणाम दावूनी समाजास समजावलं....

अनिष्ट त्या रुढी परंपरांना तूच वेसन घातलं,

धरूनी सत्याची कास मूळ जातीयतेचं उपटलं....

नावाप्रमाणेच ’ज्योतींचा बा’ ठरला ख-या अर्थानं

केले अलोकित अवघ्या जगा दीप अक्षरांचे लावून....

‘क्रांतीसूर्यच’ आला काळोखाच्या गर्भातून,

तेजाने तुझिया अज्ञान अंधकार गेला सरुन....

कळेना काही आम्हांस, कसे फेडावेत ऋण,

शब्दही पडती अपुरे करण्या तव गुणगान....

सौ.आरती डिंगोरे

# रांगोळी



श्रीमती मेघा अनिल पाटील नवापूर

जिल्हा नंदूरबार यांनी काढलेली गुढीपाडवा रांगोळी




सौ.किरण पुरुषोत्तम कावळे, सहशिक्षीका

जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळा, पाथरी पं.स.गोरेगाव जि.गोंदिया

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

नाव :- नासा येवतीकर

जन्मतारीख :-26/04/1976

शिक्षण :- बी ए डी एड

पत्ता :- शिक्षक कॉलनी, धर्माबाद जि. नांदेड

फोन :- 9423625769

शुभेच्छूक - साहित्य सेवक समूह

-----------------------------------

नाव :- डॉ. श्री. वैभव बंसिधर पाटील

जन्मतारीख :-27/04/1982

शिक्षण :- एमबीबीएस एम डी डी एम. (Cardiologist) हृदयरोग तज्ञ

पत्ता :- हृदयरोग विभाग प्रमुख ,भारती विद्यापीठ , पुणे

मोबाईल क्रमांक 081510 96369

शुभेच्छूक - श्रीमती मेघा अनिल पाटील

-----------------------------------

नाव :- सौ. अर्चना नागोराव येवतीकर

जन्मतारीख :-30/04/1984

शिक्षण :- बारावी

पत्ता :- शिक्षक कॉलनी, धर्माबाद जि. नांदेड

फोन :- 9423625769

शुभेच्छूक - साहित्य सेवक समूह

-----------------------------------

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!

नाव :- श्री.प्रवीण दंडवते आणि सौ. प्रतिभा दंडवते

लग्नतारीख :- ५/५/१९८०

शिक्षण :- बी.ए. आणि दहावी अनुक्रमे

पत्ता :- प्रितम, गुरूकुल वसाहत, इंदापूर-बारामती रोड, इंदापूर, जिल्हा-पुणे

मोबाईल क्रमांक-९६०४५५५००२/९९२२८७६४९२

शुभेच्छूक - सौ.प्रिती दबडे,पुणे

---------------------------------

नाव :- राजेंद्र प्रल्हाद शेळके

जन्मतारीख :-07/05/1985

शिक्षण :- बी. ए. डी. एड, बी. एड, एम. ए (मराठी),
एम.ए (समाजशास्त्र), डी. एस. एम

पत्ता :- मु पो किनगाव राजा ता सिंदखेड राजा
जि बुलढाणा 443203

मोबाईल क्रमांक 9823425852

शुभेच्छूक - साहित्य सेवक समूह

**आपणांस हे मासिक कसे वाटले ? आपल्या सूचना आणि प्रतिक्रिया आम्हाला eprerna2021@gmail.com येथे मेल द्वारे नक्की कळवाव्यात.**